MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक १० / ऑक्टोबर २०१८

## संपादकीय

### 'शोध गॅलिलिओच्या पत्राचा'



गॅलिलिओचे एक कल्पना चित्र

आधुनिक जग, हे ज्ञानाधिष्ठित (Knowledge Society) आहे असे आपण समजतो. अर्थातच इतिहासाचा अभ्यास केला तर हे विधान धाडसाचे आहे असे वाटायला लागते. जगातली कुठलीच प्रगती ही एखाद्या दशकात, शतकात, किंवा सहस्रकात झालेली नसते. अशी प्रगती ही कायमच होत असते. म्हणूनच प्रत्येक प्रगतीला भूतकाळ हा असतोच.

लंडनमधील प्रसिद्ध रॉयल सोसायटीच्या हस्तलिखितांच्या खजिन्यात गॅलिलिओ (१५६४ ते १६४२) या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचे एक पत्र सापडले आहे. या पत्राने विज्ञान इतिहासाच्या संशोधनामध्ये पुन्हा एकदा खळबळ माजवली आहे (Nature, Vol.561, No.7724 Pp 441-2).

सॅल्वातोर रिचीआर्डो (Salvatore Recciardo) हे इटालीमधील बर्गामो विद्यापीठात (University of Bergamo) विज्ञान-इतिहासाच्या स्नातकोत्तर विद्यावाचस्पती (Postdoctoral) या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी. गॅलिलिओ हा त्यांच्या संशोधनाचा विषय. २ ऑगस्ट २०१८ ला संबंध दिवसाचे काम आटोपल्यावर रॉयल सोसायटीच्या संगणकीकृत पुस्तकांची तालिका (Catalogue) ते चाळत होते. २१ ऑक्टोबर १६१३ च्या नोंदीमध्ये त्यांना गॅलिलिओने पिसा विद्यापीठाच्या (University of Pisa) गणिताचे प्राध्यापक बेनेदेत्तो कॅसेली (Benedetto Castelli) यांना लिहीलेले एक पत्र सापडले. ते सात पानी गॅलिलिओच्या हस्ताक्षरातील पत्र बघितल्यावर त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. गॅलिलिओच्याच नाही तर विज्ञान इतिहासामध्ये, विज्ञान आणि धर्मसंस्था यांच्या संबंधावर प्रकाश

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

टाकणारे पण अजूनपर्यंत उपलब्ध नसणारे, गॅलिलिओचे ते स्वतःच्या हस्ताक्षरातील मूळ पत्र होते. याच्या काही नकला युरोपमधील काही ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत. वॅटिकनच्या पोप यांच्या गुप्त संग्रहालयामध्ये याच्या एका प्रतीची नोंद आहे, पण मूळ अस्सल प्रत अजूनपर्यंत संशोधकांना उपलब्ध झाली नव्हती.

'ध' चा 'मा' आनंदीबाईंनी केल्यावर पेशवाईतील इतिहासाला मिळालेली कलाटणी आपल्याला माहीत आहे. या पत्राचा इतिहासही थोडासा असाच आहे.

१२ व्या १३ व्या शतकात युरोपमध्ये 'प्रबोधन' युगाला सुरुवात झाली (Renaissance). ग्रीक, पर्शियन, अरेबिक आणि संस्कृत भाषांमधील विज्ञान, आणि इतर साहित्याच्या भाषांतराला याचवेळी युरोपमध्ये सुरुवात झाली. निसर्गाच्या उत्पत्तीपासून, सगळ्या वैज्ञानिक, सामाजिक संस्थाना टोलेमी (१०० ते १६० AD) आणि बायबलच्या परिघाच्या मर्यादा होत्या. नव-विचार किंवा सर्जनाला यामध्ये मुळीच वाव नव्हता. प्रबोधनयुग हा या संघर्षातून बाहेर पडण्याचा एक प्रयत्न होता. यामुळे विज्ञान, कला, साहित्य, शिल्प सगळ्याच क्षेत्रांमध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले.

१५ व्या शतकात कोपर्निकसनी प्रबोधनयुगामधील सर्वात मोठी क्रांती केली. आधुनिक विज्ञानाला एक नवीन दिशा देणारी ती क्रांती होती. टोलेमी आणि बायबलप्रमाणे 'पृथ्वी' ही सर्व निसर्ग रचनेची केंद्रबिंदू होती (Geocentric). कोपर्निकसने ती सूर्यकेंद्रीत (Heliocentric) केली. अर्थातच अशी रचना ही चर्च/बायबल केंद्रीत सत्तेला मान्य होणे शक्य नव्हते.


येथेच विज्ञान आणि धर्मसत्तेचा संघर्ष सुरू झाला.

कोपर्निकस (१४७३ ते १५४३) चा प्रसिद्ध ग्रंथ De revolutionibus orbium coelestium (on the revolutions of the heavenly spheres) हा तो आपल्या मृत्यूपर्यंत प्रकाशित करू शकला नव्हता. ब्रुनो (१५४८ ते १६००) या वैज्ञानकाचाही कोपर्निकसच्या सिद्धान्ताला पाठिंबा होता. पोप महाशयांनी त्यांची ही कृती धर्मबाह्य ठरवली, आणि पुढे त्याला जिवंत जाळण्यात आले. बायबलमधील वचनांना कमी लेखणे, किंवा त्यांच्या विरुद्ध मत मांडणाऱ्यांना जिवंत जाळणे ही शिक्षा होती. गॅलिलिओ आणि त्याच्या वैज्ञानिक सिद्धान्ताना ही पार्श्वभूमी होती. गॅलिलिओलाही कोपर्निकसची सूर्यकेंद्रीत निसर्गाची रचना मान्य होती. म्हणूनच गॅलिलिओचाही चर्चबरोबरचा संघर्ष अपरिहार्य होता.

२१ डिसेंबर १६१३ चे गॅलिलिओच्या हस्ताक्षरातील मिळालेले मूळपत्र आणि त्यामधील 'ध' चा 'मा' बघणे म्हणूनच महत्त्वाचे आणि रंजक आहे.

१६१० साली गॅलिलिओने त्याच्या दुर्बिणीतून केलेल्या निरीक्षणांच्या आधारावर कोपर्निकसच्या सिद्धान्ताला पुष्टी देणारे Sidereus nuncius (The Starry Messenger) हे पुस्तक प्रकाशित केले. गॅलिलिओ हे पिसा आणि पदुआ (University of Padua) येथे गणित शिकवत होते. पिसामधील त्यांचे प्रयोग, आणि त्यांच्या दुर्बिणीतून केलेली त्यांची निरीक्षणे ही त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये बरीच लोकप्रिय होत होती. अर्थातच हे सगळं नवविज्ञान हे कोपर्निकसला पुष्टी देणारेच होते.

(पृष्ठ क्र. ३९ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा

**वर्ष एकोणिसावे/अंक १०/ऑक्टोबर २०१८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | व्यक्तीवेध-०९: जनार्दन स्वामी | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची - पिलू /खारखीव | श्री. प्रकाश दुधाळकर | ७ |
| ४) | जिद्द - शिखा | श्री. चंद्रशेखर टिळक | ९ |
| ५) | सण आणि आरोग्यः गणेशोत्सव | डॉ. शैलजा धर्माधिकारी | १२ |
| ६) | 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १६ |
| ७) | चोंगचिंग दौरा | पुर्णिमा विनायक साठे | २५ |
| ८) | माध्यमाच्या गोंधळातील शांतता लोकशाहीसाठी घातक | प्रा. विनोद वाघ | २८ |
| ९) | राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ | सौ. ज्योती कुलकर्णी | ३० |
| १०) | महात्म्यास जन्मदिनाच्या शुभेच्छा! | अपर्णा कुलकर्णी | ३४ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# व्यक्तीवेध-०९: जनार्दन स्वामी

*कुशाग्र बुद्धी व बहुविध व्यक्तित्व, तसेच अल्पवयातच चतुर्विध वेद-वेदान्त, अन्वय-व्यतिरेक, श्रुती-स्मृती, व्याकरण, आयुर्वेद, ज्योतिषविद्या, इत्यादी विषयांचे सखोल अध्ययन करून शास्त्रशुद्ध ज्ञान प्राप्त केलेल्या श्री. जनार्दन स्वामींचा अल्पपरिचय या लेखात करून देत आहोत - संपादक*

एकदा काही व्यक्तीगत कारणांमुळे नागपूरला जाण्याचा योग आला होता. तेव्हा एके दिवशी सकाळीच जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या एका शाखेत अगदी योगायोगानेच जाऊन पोहोचलो. मी शाळेत असताना (१९७३-७४ चा सुमार असेल) स्वतः जनार्दनस्वामी आमच्या शाळेत येऊन आम्हाला सुलभ सांघिक योगासने शिकवत असत. तेव्हाची आठवण जागी झाली. आज नागपूरच्या रामनगरातील त्यांच्या योगाभ्यासी मंडळाच्या कार्याचे एका मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले दिसून येते. नागपूर व विदर्भात मिळून मंडळाच्या ९४ शाखांतून दररोज सांघिक योगसाधनेची निःशुल्क सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सांघिक योगासने, योगोपचार, योगाभ्यास व योगसाधना या सर्वच उपक्रमांद्वारे नागपुरात या योगपीठाचे कार्य सिद्धीस पोहोचलेले दिसून येते. त्याच अनुषंगाने श्री. जनार्दनस्वामींचा अल्पपरिचय इथे करून देत आहे.




योगमूर्ती परमपूजनीय श्री. जनार्दनस्वामीजींचा जन्म, कार्तिक वद्य १४, शके १८१४ (इसवी सन १८९२) या दिवशी, महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील कवठे गावी झाला. कुशाग्र बुद्धी व बहुविध व्यक्तित्व असलेल्या स्वामीजींनी अल्पवयातच चतुर्विध वेद-वेदान्त, अन्वय-व्यतिरेक, श्रुती-स्मृती, व्याकरण, आयुर्वेद, ज्योतिषविद्या, इत्यादी विषयांचे सखोल अध्ययन करून शास्त्रशुद्ध ज्ञान प्राप्त केले.

स्वामीजी स्वतःच एक चालते बोलते तीर्थक्षेत्र होते. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन, संन्याशाश्रमाची दीक्षा घेतली होती. भारतभ्रमण व नर्मदा परिक्रमा करत असताना, एका अज्ञात संन्याश्याने त्यांना योगविषयक मार्गदर्शन केले.

नंतर स्वामीजी नागपुरात आले. तो सूर्योदय नागपूरकरांसाठी भाग्यशाली ठरला. नागपूर ही कर्मभूमी मानलेल्या स्वामीजींनी 'शिवभावे जीवसेवा' हे परमहंसांचे ब्रीद हृदयाशी बाळगून, आबालवृद्धांना व्याधिमुक्त होण्याचा महामंत्र देण्यास प्रारंभ केला. तो मंत्र होता : करा हो नियमित योगासने! धर्म, संप्रदाय, भाषा, लिंग, आयु, आर्थिक परिस्थिती या सर्व भेदभावांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानव जातीच्या उद्धारासाठी समाधान, सौख्य व निरोगत्व ही उद्दिष्टे साधण्याकरता योगसाधना अंगिकारण्याचा महामंत्र

---

पाखंडीपणा हा माणसाच्या फक्त जिभेवर असतो; तो त्याच्या हृदयात नसतो. - बॅकॉन

वायुवेगाने आबालवृद्धांपर्यंत पोहोचवण्याचे महत्कार्य करणारी ही महान विभूती नागपूर शहराचे वैभव ठरली!

त्यांनी योगप्रसार व योगोपचार हे जीवनाचे अंतिम लक्ष्य ठरवून, घरोघरी योगगंगा पोहोचवण्याकरता, १९५१ साली योगाभ्यासी मंडळाची स्थापना केली. प्रत्येकाला समाधान, सुख व निरोगी जीवन लाभावे म्हणून, सेवाभावाने, निःशुल्क योगप्रशिक्षण देणे, योगप्रसार करणे, हे योगाभ्यासी मंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

स्वामीजी वीतराग, अनिकेत व अयाचित वृत्तीने कठोर संन्यस्त जीवन जगले. त्यांचे आयुष्य अनेकांच्या स्मृतीपटलावर आजही कोरलेले आहे. नागपूरला 'योगपीठ' स्थापन करणारी ही 'युगनिर्माता' विभूती, वैशाख कृष्ण १२, शके १९००, अर्थात २ जून १९७८ रोजी समाधिस्थ झाली. मंडळ परिसरातील स्वामीजींची समाधी योगसाधकांना सतत प्रेरणा देत आहे.

स्वामीजींनी वडिलांच्या अस्थि-विसर्जनाच्या निमित्ताने पायी हरिद्वारची यात्रा केली. परतताना हिमालयातही खूप प्रवास केला. सिद्धपूर येथे एका मंदिरात राहत असताना स्वामीजींना अज्ञात गुरूंकडून योगाभ्यासाची दीक्षा मिळाली. त्यांनी दोनदा नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. मग नर्मदाकिनारीच हुशंगाबादच्या दत्तमंदिरात त्यांनी योगासने शिकवण्यास सुरुवात केली.

आज दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे, मासिके इत्यादी माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर योगप्रचार सुरू असताना, स्वामीजींनी त्या काळात योगासने शिकवताना किती खडतर परिश्रम घेतले असतील याची कल्पनाही करणे कठीण आहे. ज्या काळात योगाविषयी अज्ञान होते, समाजात उपेक्षेची वृत्ती होती, त्या काळात धीरोदात्तपणे व अत्यंत चिकाटीने स्वामीजींनी लहान मुलांपासून, मोठी माणसे व महिला यांच्यापर्यंत सर्वांना योगासने शिकवली. त्यांची आसने शिकवण्याची पद्धत अतिशय सोपी होती. योगासने करून अनेक आजार बरे होऊ शकतात याचा विश्वास त्यांच्या कार्यामुळे लोकांमधे निर्माण झाला. त्यांनी प्रामुख्याने मध्यप्रदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यांमधे पायी फिरून योगासने शिकवली.

स्वामीजींची योगप्रसार-प्रचाराबाबतची श्रद्धा आणि चिकाटी दांडगी होती. त्या काळी खांडव्याला श्री. तोमर या नावाचे गृहस्थ, नॉर्मल स्कूलचे अधीक्षक होते. त्यांना शाळांतून योगप्रसार करावा ही स्वामीजींची कल्पना पसंत पडली. त्यांच्याच सहकार्याने १९४८ मधे स्वामीजींनी शाळांतून योगप्रसार करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्याकरता सूर्यनमस्कारादी १२ आसनांच्या सामूहिक व्यायामाचे एक प्रात्यक्षिकच त्यांनी सादर केले. नॉर्मल स्कूल शिक्षकांना सुमारे दहा मिनिटांची ही योग-कवायत स्वामीजींनी शिकवली. फक्त दहा मिनिटेच. किती अल्पकाळ. पण तेवढ्या वेळातच जमिनीवर घामाने आकृती निघे. या कवायतीसोबतच मयुरासन, सर्वांगासन, हलासन, शीर्षासन, शवासन अशा काही महत्त्वाच्या आसनांचा सुमारे २०-२५ मिनिटांचा कार्यक्रमही स्वामिजींनी तयार करून दिला. श्री. तोमर फारच प्रभावित झाले होते. १५ दिवसांनंतर तोमर यांच्या आग्रहावरून एका हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. गुप्ता यांनी तोच कार्यक्रम त्यांच्या शाळेत राबवला. पुढे मध्यप्रदेशातील एक जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. एन. एच. मुजुमदार यांच्या शिफारशीवरून त्या काळचे जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. एम. एस. मोडक यांनी शाळांना पत्र पाठवून सांघिक योग-कवायतींचा कार्यक्रम राबवण्यास सांगितले.

योगप्रसारार्थ, १९४८ साली त्यांनी अमरावतीला योगसंमेलन भरवले व भारतीय योगाभ्यासी मंडळाची स्थापना केली. त्यानंतरच त्यांनी 'सुलभ सांघिक आसने' व 'प्राणायाम' ही पुस्तके लिहिली. शास्त्रीय संशोधन करून योगासनांच्या स्वरूपात सूर्यनमस्कार विकसित केला. त्याचे सचित्र तक्ते तयार केले. या सर्व साहित्याची

प्रत्येक वस्तूत सौंदर्य असते, पण प्रत्येकालाच काही ते दिसत नाही. - कन्फ्युशिअस

किंमत ते अत्यल्प ठेवत असत. ते स्वतःच अशा साहित्याची विक्रीही करत. योगाभ्यास मात्र निःशुल्क शिकवत असत. १९५१ च्या संक्रांतीस स्वामीजी नागपुरात आले. नागपूरला त्यांनी दुसरे 'भारतीय योग संमेलन' आयोजित केले.

योगासनांच्या प्रसारात स्वामीजींचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे 'सांघिक आसने' होय. आतापर्यंत योगासनाविषयी, 'ती एकट्याने करावयाची मोक्षप्राप्तीची कठोर तपस्या आहे' असेच वातावरण होते. परंतु स्वामीजींच्या सोप्या सांघिक पद्धतीमुळे गावोगावी योगाचा प्रचार सुलभ झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शारीरिक शिक्षण कार्यक्रमात योगासनांचा समावेश करण्याचे ठरल्यावर परमपूजनीय सरसंघचालक श्री. गुरुजींनी जनार्दनस्वामींनाच प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांकरता आसनांची निवड व क्रम ठरवून पुस्तक लिहिण्यास सांगितले. त्याप्रमाणे जनार्दनस्वामींनी संघाच्या शारीरिक शिक्षण कार्यक्रमाची योजना करून दिलेली आहे. जानेवारी २००२ मधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भारतात ३३,००० गावी शाखा होत्या. जगभर ३५ देशांमधे संघाचे काम सुरू होते. या शाखांच्या माध्यमातून लाखो स्वयंसेवकांपर्यंत योगासनाचा प्रचार होत असे.

श्री. एकनाथजी रानडे यांनी कन्याकुमारीच्या श्रीपाद शिलेवर विवेकानंदांचे अप्रतिम स्मारक उभारल्यानंतर, 'विवेकानंद केंद्र' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना १९५८ मधे केली. या संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणात योगासनांना अग्रक्रम देण्याचे श्री. एकनाथजींनी ठरवले. त्याकरता व विवेकानंद केंद्राच्या जीवनव्रती कार्यकर्त्यांना योगासने व इतर योगक्रियांचे यथोचित मार्गदर्शन करण्यासाठी, स्वामीजींना त्यांनी कन्याकुमारीस येऊन राहण्याची विनंती केली. त्यासाठी ते प्रत्यक्ष नागपूरला येऊन स्वामीजींना भेटले. स्वामीजींनी हे दायित्व तत्काळ स्वीकारले. विवेकानंद केंद्राच्या पहिल्या शिबिराच्या उद्घाटनाला स्वामीजी उपस्थित राहिले. त्यानंतर महिनाभर तेथेच मुक्काम करून, त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणे जीवनव्रतींना सर्व प्रकारच्या योगक्रिया स्वतः शिकवल्या. त्यानंतर प्रत्येक वर्षी येणाऱ्या नवीन जीवनव्रतींना सतत काही वर्षे स्वामीजींचे मार्गदर्शन लाभले.

विवेकानंद केंद्राच्या या प्रशिक्षण वर्गात स्वामीजींच्या साहाय्याला, इंग्लंडमधून काही काळासाठी भारतात आलेले तरुण इंजिनियर श्री. कनू गोविल व मुंबईचे श्री. कोठारी हे असत. आज विवेकानंद केंद्राच्या सर्व शाखांतून स्त्री-पुरुषांना योगासनांचे प्रशिक्षण देण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात चालू आहे. त्यात स्वामीजींच्या तालमीत तयार झालेले काही कार्यकर्ते आहेत.

आपल्या समाजात जुन्या काळी काही अज्ञानी व अविवेकी लोकांनी योगासंबंधी बराच अपप्रचार केला होता. त्यामुळे समाजात एक अपसमज रूढ झालेला होता की, योगासने स्त्रियांना शिकवू नयेत. स्वामीजींनी या रूढीविरुद्ध कुठलाही आरडाओरडा न करता, महिलांना योगासने शिकवण्यास सुरूवात केली. आपल्या देशातील कुटुंबरचना अशी आहे की, घरातील स्त्रीवर विविध जबाबदाऱ्यांचा भार येत असतो. हा सर्व ताण सहन करतांना तिची प्रकृती ढासळते. तिला अनेक आजार होतात. त्यावर केवळ औषध उपयोगी नसते. घरातील स्त्री दुःखी असेल तर संपूर्ण कुटुंबावरच त्याची छाया पडत असते. त्यामुळे स्त्रीचे आरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे. स्त्री सुखी-आनंदी तर सारे कुटुंब सुखी व आनंदी राहू शकते. स्वामीजींनी घरोघरी जाऊन तसेच महिलांकरता स्वतंत्र सांघिक योगासनांचे वर्ग सुरू करून एक मौन क्रांती घडवून आणली. नागपूरच्या महाल भागात श्री. लक्ष्मीनारायण मंदिरातील सभामंडपात योगाभ्यासी मंडळाच्यावतीने महिलांकरता योगासनांचे वर्ग सुरू झाले.

---

सौंदर्य म्हणजेच सत्य आणि सत्य म्हणजेच सौंदर्य. - कीट्स

डॉ. श्री. भा. वर्णेकर नागपूर विद्यापीठात संस्कृत विभागप्रमुख होते. ते एके दिवशी योगाभ्यासी मंडळात स्वामींना भेटण्यासाठी गेले असता, स्वामीजींनी एक कागद त्यांच्या हाती दिला. त्यात लिहिले होते की, 'जीवनात आरोग्य, सुख आणि समाधान प्राप्त करण्याचा एकमात्र उपाय योगाभ्यास हाच आहे. प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे नित्य योगाभ्यास करावयास हवा.' डॉ. वर्णेकर हा मजकूर वाचून स्वामीजींकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले. स्वामीजी हसून म्हणाले, 'पाहता काय असे, या अर्थाचा संस्कृत श्लोक आताच्या आता करून दाखवा.' डॉ. वर्णेकरांनी लगेचच त्या संदेशाचा एक श्लोक तयार केला. तो असाः

समाधानाय सौख्याय नीरोगत्वाय जीवने ।
योगमेवाभ्यसेत् प्राज्ञः यथाशक्ति निरंतरः ।।

योगाभ्यासी मंडळाच्या मुद्रेवर हाच संदेश कोरला गेला. पुढे नागपूरच्या रामनगरातील योगाभ्यासी मंडळात स्वामीजींच्या समाधीस्थळावरही हाच संदेश अंकित केला आहे. योगाभ्यासी मंडळाचे ते बोधवाक्य म्हणूनच प्रचलित झालेले आहे.

अतिशय सोप्या भाषेतील स्वामीजींची आसनांवरील पुस्तके हा आपल्यासाठी त्यांचा खूप मोठा ठेवा आहे. आसने व तीही 'सांघिक' करण्याविषयी स्वामीजी आग्रही असत. कुणी त्यांना विचारले की, हीच आसने घरी केली तर चालणार नाही का? त्यावर स्वामीजी उत्तर देत की, 'चालेल'. पण सामुदायिक आसनांच्या ठिकाणी आसने केल्यास आळस येत नाही आणि नियमितपणात घरच्यासारखा व्यत्यय येत नाही. त्यांनी वयाच्या ८५-व्या वर्षापर्यंत घरोघरी जाऊन आसने शिकवली. परंतु प्रारंभापासूनच वेगवेगळ्या मोहोल्ल्यांत जायचे, तेथे आसनांसाठी उपयुक्त जागा शोधायची व योगाभ्यासाचे केंद्र असे स्वरूप त्याला आणायचे अशी योगविस्ताराची त्यांची पद्धत होती. समाजात योगासने शिकवताना वय, जात-पात, स्त्री-पुरुष असा कुठलाही भेद ते ठेवत नसत.

एकदा एका वर्गात स्वामीजींनी प्रात्यक्षिके स्वतःच करून दाखवली. त्यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. एका माणसाने त्यांना प्रश्न विचारला की, 'स्वामीजी, वयाच्या कोणत्या वर्षी आसने सुरू करावीत?' स्वामीजींनी त्याचे मोठे मार्मिक उत्तर दिले. ते म्हणाले की, 'मनुष्य जन्माला येण्यापूर्वी गर्भासनात असतो आणि अंतिम श्वास गेला की शवासनात असतो. त्यामुळे वयाच्या कोणत्या वर्षी आसने सुरू करावी हा प्रश्न चुकीचा आहे. कोणत्या वयात कोणती आसने करावीत, असा प्रश्न विचारला जाऊ शकतो!' स्वामीजींच्या या उत्तराने वर्गातील साऱ्याच योगप्रेमींचे डोळे उघडले.

अशा विविध वर्गांचे आयोजन करताना स्वामीजींच्या कर्मठतेचा अनुभव लोकांना आला आहे. नागपूरच्या माधवनगर मधे असाच एक वर्ग सुरू झाला. स्वामीजी दर मंगळवारी त्या वर्गात योगासने शिकवण्यासाठी जात असत. एके दिवशी त्या वर्गात स्वामीजी एकटेच आसने करत होते. त्याबद्दल डॉ. वर्णेकरांनी त्यांना प्रश्न विचारला की, 'स्वामीजी, या वर्गात जर कोणीच उपस्थित राहत नाही, तर आपण आपला वेळ येथे का घालवता?' स्वामीजी त्यावर शांतपणे म्हणाले की, 'हा वर्ग जाहीरपणे सुरू झाला आहे, तसा तो जाहीरपणे बंद झालेला नाही. त्यामुळे कोणीही उपस्थित नसले तरीही वर्ग चालू आहे. वर्गात आसने करणारा कोणी नसला तरी मी हजर असतो तेव्हा आसने करून वर्ग चालू ठेवतो.' स्वामीजींनी योगप्रचार करताना सुरुवातीपासूनच अशी निष्ठा ठेवल्यामुळेच गावोगावी योगासनांचे वर्ग चालवताना शिक्षकांसाठी एक आदर्श उदाहरण निर्माण झाले.

१९७१-७२ मधे इंग्लंडमधून श्री. कनू गोविल या

(पृष्ठ क्र.८ वर)

सौंदय ही एक शक्ती आहे आणि स्मित हे त्या शक्तीचे अस्त्र आहे. - चार्लस रीड

# ओळख वनस्पतींची
# पिलू/खारखीव

*'पिलू / खारखीव' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, खाडीकिनाऱ्यावर असलेले कांदळवन किंवा खारपुटीची झाडे आपण पाहिली असतीलच. कांदळवनात अनेक झाडे त्यांच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांसह एकमेकांसोबत गुण्यागोविंदाने राहात असतात. ही झाडे फक्त खाडी किनाऱ्यांवरच जगू शकतात. किंबहुना त्यांची निर्मितीच खाडी किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी निसर्गाने केली आहे. त्यामुळे तेथील दलदल, दमट हवामान व खारपट जमीन त्यांच्या वाढीसाठी आवश्यक आहे. ही झाडे मैदानी प्रदेशात जगू शकणार नाहीत. पण याच कांदळवनाच्या गर्दीत एक झाड असे आहे की ते खाडी किनारी तसेच मैदानी प्रदेशात देखील तितक्याच समर्थपणे जगू शकते. त्याला जशी दलदल किंवा दमट हवा मानवते तसेच शुष्क अन् रेताड प्रदेशातही तितक्याच जोमाने ते वाढू शकते. या झाडाचे नाव आहे खारखीव किंवा पिलू. ही झाडे महाराष्ट्रात समुद्र किनाऱ्याच्या व खाडीच्या आसपास आढळतात. गुजरातमध्ये बहुतेक भागात ती दिसून येतात. भारतात सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात याचा वावर आहे. त्याच प्रमाणे जगात बऱ्याच देशात हा वृक्ष आढळतो.



याला वृक्ष म्हणावे की झुडुप हा प्रश्न पडतो. तथापि हा छोटेखानी वृक्ष आहे. उंची साधारण ४ मीटरपर्यंतच वाढते. जमिनीकडे झुकणाऱ्या लवचिक फांद्या वादळवाऱ्यामध्ये सहज टिकून राहतात. खोडाची उंची फारशी नसते. १ ते १.५ मीटर उंचीपासूनच फांद्याची सुरुवात होते. साल पांढुरकी, राखाडी रंगाची व भेगाळलेली. कोवळ्या फांद्यांचा रंग जवळ जवळ पांढराच, एकमेकांसमोर असलेली लंबगोलाकार किंवा भालाकार पाने, मांसल तथा शिरा स्पष्टपणे न दिसणारी अशी. सर्व पानांच्या आकारात सारखेपणा अभावानेच आढळतो. रंग मातकर हिरवा. तथापि कोवळी पाने पोपटी व तजेल दिसतात. नोव्हेंबर ते मे या दरम्यान झाडाला विरळ शाखा असणारे तुरे येतात. याच तुऱ्याला पिवळसर हिरवट रंगाची बारीक फुले येतात. पण झाड आपले लक्ष वेधून घेते ते याला फळे आल्यावरच. कारण ही फळे अगदी वैशिष्ट्यपूर्ण अशी असतात. काचेचे लहान लहान मणी अलगद ठेवल्यासारखी ती लांबून दिसतात. प्रथम पांढुरकी दिसणारी काहीशी पारदर्शक फळे जशी पिकू लागतात तसा त्यांचा रंग बदलत जातो. प्रथम गुलाबी मग तांबडा व पूर्ण पिकल्यावर जांभळट. फळाचा पारदर्शीपणा मात्र शेवटपर्यंत टिकून असतो. आपल्या या आकर्षक रंगामुळे ही फळे विविध पक्ष्यांना आकर्षित करून घेतात. या काळात बुलबुल सारखे पक्षी या झाडावर हमखास गर्दी करतात. या फळांच्या बीयांपासून तेल मिळते. त्याचा उपयोग औषधी म्हणून तसेच साबण उद्योगात होतो. ही गोड फळे चाखून पाहण्यास मुळीच हरकत नाही.

पिलूची झाडे सर्व अरेबियन जगतामध्ये 'टूथब्रशची झाडे' म्हणून परिचित आहेत. याला इंग्रजीमध्ये Toothbrush tree असेच नाव आहे. तसेच त्याला

Arak, Mustard tree किंवा Meswak या नावानेही ओळखतात. मेसवॉक टूथपेस्टचे नामकरण याच झाडाच्या नावावरून केले आहे. कारण या झाडाच्या बारीक फांद्यांपासून दात घासण्याचा ब्रश तयार करतात. याचे तंतू लवचिक असल्यामुळे फांदीपासून २० ते २५ सें.मी.च्या काड्या कापून त्यांची टोके ठेचून हे ब्रश तयार केले जातात. कारण या झाडामध्ये जंतुसंसर्ग रोखण्याची क्षमता असून मौखिक आरोग्यासाठी आवश्यक Abrasivas, antiseptics, enzyme inhibitor आणि fluoride इत्यादी असल्यामुळे दातांचे आरोग्य तसेच तोंडाचे आरोग्य चांगले राहते. आपल्याकडे देखील समुद्र किनाऱ्यावरील तसेच खाडी किनारी राहणारे लोक याचा दातवण म्हणून वापर करतात. आता टूथब्रश व पेस्टच्या आक्रमणामुळे हे पारंपरिक उपयोग इतिहास जमा झाले आहेत. तरी देखील ग्रामीण भागात अजूनही याचा वापर होताना दिसतो. आपण वापरत असलेली Meswak पेस्ट याच वनस्पतीच्या (Meswak Herb) सहाय्याने तयार केली आहे व तसा उल्लेख त्या पेस्ट ट्यूबवर करण्यात आला आहे. सामान्यपणे बाभाळी किंवा कडूलिंबाच्या कांड्या दातवण करताना जशा खवून त्यातील तंतू विलग करतात त्याच पद्धतीने पिलूच्या कांड्या वापरल्या जातात. त्यामुळे कांडीच्या सालीतील व खोडामधील रस तोंडात उतरतो. तो सर्वत्र पसरून तोंडातील जंतूंना मारतो. भारत, पाकिस्तान, श्रीलंका यासह सर्व मुस्लीम देशांत याचा वापर अजूनही होतो. या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Salvadora persica (SALVADORA PERSICA). या झाडाचा प्रसार पक्ष्यांमार्फत होतो. एकदा रुजले की त्याची कोणतीही काळजी न घेता ते टिकून राहते. कोणत्याही परिस्थितीत टिकून राहण्याची जबरदस्त क्षमता या झाडामध्ये आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

(पृष्ठ क्र. ६ वरून – **व्यक्तीवेध–०९: जनार्दन स्वामी**)

तरुणाचे नागपुरात आगमन झाले. ते इंजिनियर होते. योगासने शिकण्याकरताच आलेले होते. योगाभ्यासी मंडळातील पहिल्या दिवशी त्यांना मांडी घालून धड बसताही येत नव्हते. पाश्चात्य देशांतील जीवनशैलीमुळे तेथील सर्वांचीच अशी अवस्था असते. गोविल यांची योगासने शिकण्यातील अपार रुची आणि स्वामीजींच्या शिकवणुकीमुळे एक–दीड वर्षात अत्यंत कठिणात कठीण आसन त्यांनी शिकून घेतले. प्रत्येक आसनाची पूर्ण स्थिती त्यांना सहजपणे येऊ लागली. योगाभ्यासी मंडळात विविध आसनांच्या प्रात्यक्षिकांची त्यांचीच प्रकाशचित्रे आजही लावलेली आहेत. अन्य कुणाचीही नाहीत. इंग्लंडला परतताना स्वामीजींनी त्यांना उपदेश केला की, 'या विद्येचा व्यापार करू नको. केल्यास ती विद्या समाप्त होईल'.

**संदर्भः** योगमूर्ती श्री. जनार्दनस्वामी, लेखकः श्री. रवींद्र शंकर जोशी, प्रकाशकः भारतीय विचारसाधना, नागपूर, प्रकाशनकाळः प्रथमावृत्ती, जानेवारी २००९, किंमत रु.६/– फक्त.

जनार्दनस्वामी, योगाभ्यासी मंडळ व त्यांच्या कार्यासंबंधी अधिक माहिती, पुस्तके, अभ्यासक्रमांचे तपशील इत्यादी खालील पत्त्यावर मिळू शकेल. जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ, योगमंदिर, रामनगर, नागपूर–४४००३३. दूरध्वनीः०७१२–२५३२३२९,
ई–मेलः jsyogrediffmail.com,
संकेतस्थळः www.jsyog.org.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

सर्वांशी सौजन्याने वागा, फार थोड्यांशी जवळचा संबंध ठेवा, एकच मित्र जोडा, शत्रू मात्र कोणाचेही होऊ नका. – बेंजामिन फ्रँकलीन

# जिद्द - शिखा

*प्रख्यात अर्थतज्ज्ञ, लेखक व NSDL चे उपाध्यक्ष चंद्रशेखर टिळक यांचा आईबद्दल तरल आठवणी जागवणारा लेख - संपादक*

अग्निशिखा हा शब्द लहानपणापासून माहीत आहे. विविध ठिकाणी वाचला आहे अशा अर्थाने माहीत आहे हो! सुरवातीला तो शब्द वेगळा वाटायचा! अर्थ तर बिलकुल नाही कळायचा! आज आयुष्याची सहा दशके पूर्ण व्हायच्या उंबरठ्यावर तरी कुठे तो कळला आहे? पूर्णपणे तर सोडाच!

जाणवतो, भासतो, पण उमगत नाही, उपजत तर नाहीच नाही.

क्षितिजरेषा भासते, दिसते, निदान तसं वाटते.

आपण पुढे सरकावे तर तीही आणखीन पुढे सरकते.

आयुष्याच्या या टप्प्यावर फार वाटते ... क्षितिजरेषेवर स्वतःची हुकमत गाजवतात त्यांना अग्निशिखा म्हणतात... त्या मोहक म्हणावं तर दाहक असतात. दाहक म्हणावं तर मोहक असतात.

त्यांचं नुसतं स्मरणही प्रेरक असतं. त्या जाणीवेला 'आई' म्हणतात .....

तिच्या नकळत्या वयात तिचे वडील गेले. अत्यंत लहान वयात मामलेदार बनलेला प्रज्ञावन्त पुरुष तिचा पिता होता. ते तेज कळायचं तिचे वय नव्हते इतक्या लहान वयात तिचा पिता देवाघरी गेला. पण ही जिद्द - शिखा ते मनोमन वसलेले तेज आयुष्यभर विसरू शकली नाही. ते तेज आत्मसात करण्यात तिने आयुष्य वेचले. काही प्रमाणात तरी ते तिच्या अपत्यानी अस्तित्वात आणावे म्हणून ती झगडत राहिली ...

'अशक्य' हा शब्द फक्त शब्दकोशातच चांगला असतो; बाकी तो निरुपयोगी असतो हे तिच्या आयुष्याचे सूत्र होते.

'आपल्या सीमारेषा परिस्थिती ठरवू शकते यावर जर तुमचा विश्वास असेल तर तुम्ही माझी मुलं नाहीत; माझ्या भाव - विश्वात तुम्हांला कदापिही स्थान नाही; कर्तव्य म्हणून तुमचे करेन; पण ते फक्त कर्तव्य म्हणून असेल' हे सांगायला जी कधीही कचरली नाही आणि नुसतं सांगून जी कधी थांबली नाही तिला जिद्द-शिखा नाही म्हणायचे तर काय म्हणायचे?

वडील लहान वयात गेले तरी ती अनाथ नव्हती. तिचे आजोबा, तिचे काका यांच्या समर्थ सहवासात तिचे लग्न होईपर्यंतचे आयुष्य गेले. आपले काका आणि आपली अकरा भावंडे ( चुलत - आत्ये अशी धरून जी सगळी हिच्या काकांच्या घरी वाढली ) यांचा सार्थ अभिमान असणारी ही .....

अभिमान, आत्मीयता आणि आपुलकी किती; तर जेंव्हा मी तीन - चार वेगवेगळ्या भाषांत भाषणे करू लागलो तेंव्हा ही हिचे काका आणि हिचा चुलतभाऊ किती लीलया वेगवेगळ्या भाषांत बोलू शकत ते ही सांगायची... काकांविषयी आदर आणि भावांविषयी आपुलकी नुसती ओघळत असायची .... योग्यच होते ते ...

भावूक, भाविक एकारान्त माहेरातून ती बावळट (एकारान्त नसलेल्या अशा अर्थाने हो) सासरी आली. निर्धन आणि निर्गुण यातला फरक कळून घेण्यात तिच्या तारुण्याचा काही काळ गेला.

कर्तृत्ववान, कनवाळू पण अबोल नवऱ्याच्या वाटचे आणि वतीने बोलण्याची भूमिका हिने पत्करली. अर्थातच तिची भूमिका इतकी मर्यादीत कधीच राहिली नाही.

महत्त्वाकांक्षा, मेहनत, जिद्द यांचे भन्नाट एकत्रीकरण होते ते. म्हटलं तर संयुग. म्हटलं तर मिश्रण. अनंत ठिकाणी एकरूप. आणि तरीही स्वतःचं स्वतंत्र केवळ अस्तित्वच नाही तर वैशिष्ट्य अबाधित राखलेले. एकाने पुस्तकाला हात लावला नाही आणि हिच्या हाताने पुस्तक कधीही सोडले नाही.

कोणत्याही विषयाचे वावडे नाही असे हिचे वाचन. मुलगा स्वतःच्या घरात राहायला गेला याचा हिच्या नवऱ्याला आनंद; हिला अभिमान.

मुलाचा हजारो पुस्तकांचा संग्रह त्याच्या घरात न जाता निदान ती पुस्तके तरी मूळ घरात राहावीत ही हिच्या नवऱ्याची भूमिका.

'जर खरंच माझा मुलगा असेल आणि माझे संस्कार रुजले असतील तर तो पुस्तकांशिवाय राहूच शकणार नाही आणि यामुळे तो आपोआप येता – जाता राहील' अशा भूमिकेची ही व्यवहारी.

'नवीन पुस्तके मागवलीस तर मूळ घराच्या पत्त्यावरच मागवत राहा; त्यांना कव्हर्स घालून ठेवेन' असं स्वतःच्या मुलाला सांगणारा हिचा नवरा. माझे वडील.

'पुस्तके इकडेच मागवत जा; म्हणजे तू सध्या काय वाचतो आहेस हेही मला कळेल आणि मलाही नवीन पुस्तके कळत राहतील' हे सांगणारी ही.

ऐनवेळी मी घरात नसताना मला एखादे पुस्तक लागले तर माझ्यासाठी वेळप्रसंगी शिडीवर चढूनही पुस्तक काढणारे माझे वडील.

'पुस्तक ज्याचे त्याने काढले पाहिजे असली' तत्वप्रणाली असणारी ही.

त्यामागे असणारी हिची विचारधारा तर भारीच. 'एक पुस्तक काढायला गेलं तर आपोआपच दुसरीही पुस्तके बघितली जातात. डोक्यात जो विषय असेल त्याच्याशी संबंधित पुस्तके, संदर्भ आठवत जातात आणि असं होत नसेल तर तुम्ही ते वाचलेले नसते हे तर कळतं' असं ठणकावून सांगणारी ही.

याबाबत एकीकडे हे सांगताना तिची व्यवहारी वृत्तीही तिला सोडून गेलेली नसायची. तुमचे घर बंद असते हे प्रत्येक कुरियरवाल्याला कशाला कळायला हवं? असले बिनतोड मुद्दे हिचे.

नुसतं वाचणारी नाही तर माझी मुलं पुस्तके लिहिणारी होतील असली जिद्द बाळगणारी ही स्त्री. खरं म्हणजे, माझी मुलं पुस्तकाचा, लेखांचा विषय झाली पाहिजेत (आणि तेही तिच्या हयातीत) असली इच्छा (स्वप्न नाही) बाळगणारी जिद्द – शिखा म्हणजे आई.

माझ्या लहानपणी मी सुटीत आजोबांकडे (हिचे काका) राहून परत आलो की हिचा तिच्या काकांना हमखास प्रश्न .... 'याने सुटीत काय वाचले?'

अर्थातच माझ्या वाचनावर हिचे लक्ष फक्त माझ्या लहानपणीच नव्हते हो.

'अलीकडे तुला डिक्शनरी बघताना बघितले नाही म्हणजे तू नवीन विषयातले, नवीन क्षेत्रातील काहीतरी वाचत नाहीस का?' असं आपल्या पंचेचाळीस वर्षांच्या मुलाला विचारणाऱ्या महिलेस किती अर्थांनी ''माझ्या आये म्हणावं लागते!''

'गेले अनेक महिने एकाच विषयावरची एकाच भाषेतली पुस्तके तुझ्या टेबलावर दिसतात. मग इतर भाषांचे काय? तू एखादे पुस्तक लिहीत आहेस असं म्हणावं तर लिहिण्याचे कोरे कागद कुठे आहेत? पुस्तक लिहिण्याआधी तयारी करावी लागते. त्या तयारीच्या नोट्सची रायटींग pads तयार करण्याची पद्धत का सोडली? त्यासाठी महत्त्वाच्या क्रमवारीनुसार वेगवेगळ्या रंगाची पेनं वापरणे सोडले? वाचक त्याचा वेळ देऊन तुमचे पुस्तक

वाचतो हे विसरले काय? वाचकाचा असा अपमान करण्याचा अधिकार कधीच कोणत्याच लेखकाला नसतो' हे लेखन – पुरस्कार स्वीकारून घरात शिरणाऱ्या मुलाला दिलेली गिफ्ट! त्याच्या पन्नासाव्या वर्षी!!

मला आयुष्यातला पहिला पुरस्कार मिळाला. पुण्याला भरगच्च कार्यक्रमात. फिल्ड मार्शल माणेकशॉ यांच्या हस्ते. माझ्या वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू; तर माझ्या तीन वर्षाच्या मुलाला मांडीवर घेतलेल्या हिच्या डोळ्यांत अभिमान. कार्यक्रमानंतर घरी गेल्यावर हिला नमस्कार करायला वाकलो तर म्हणाली.... 'आडनाव वारसा हक्काने मिळालं, यात तुझे कर्तृत्व काय आणि तुझ्या वारसदारानी त्यांच्या नावानंतर आणि आडनावाच्या आधी तुझे नाव अभिमानाने लावावे असे तुझे कर्तृत्व आहे का हा प्रश्न दररोज विचारत जा; स्वतःला न चुकता' असला आशीर्वाद देणारी ही.

माझ्या वाचना इतके नसले तरी माझ्या भाषणावर आणि त्यांच्या विषयांबाबत हिला उत्सुकता असायची. एकदा साधारणपणे एकाच विषयाच्या दोन वेगवेगळ्या वह्यात काढलेल्या नोट्स हिने बघितल्या. त्या तशा का असा हिचा प्रश्न. जेंव्हा मी सांगितले की, 'एक माझ्या जाहीर भाषणाच्या आहेत आणि एक मॅनेजमेंट संस्थेत शिकवण्याच्या आहेत.' त्यावर ही म्हणाली... 'म्हणजे एकात तू तुझे मत मांडतोस आणि दुसऱ्यात हा विषय.' हिला एकदा तरी मी वर्गात कसे शिकवतो आणि सलगपणे चार-चार तास एखादे सेशन घेतो तेंव्हा विद्यार्थी कसे रीॲक्ट होतात हे प्रत्यक्ष बघायचे होते. 'तुझा विषय, तुझी भाषा आणि तुझी शैली लोकांपर्यंत पोचली पाहिजे' हा तिचा माझ्या भाषणाबाबतचा सल्ला होता.

माझ्या नकळत तो मनोमन निकष झाला. तो दरवेळी निष्कर्ष झाला तर... ही प्रचंड बोलकी. आम्ही तिन्ही भावंडं त्याबाबतीत आईच्या वळणावर. वडील तसे अबोलच. त्यांच्या साठीशांतीच्या वेळी ते म्हणाले 'माझ्या तीनपैकी एकाही अपत्याला याबाबत जरा वडिलांच्या वाटेने जावे असं काही वाटलं नाही.' त्यांच्या पंचाहत्तरीला तर ते म्हणाले, 'माझी तीन मुलं त्यांच्या आई सारखी स्वतःशीच बोलतील की काय अशी भीती वाटू लागली आहे.' नंतर कधीतरी हा विषय निघाला तर ही उसळून म्हणाली. 'बोलून पैसे मिळतात का हा प्रश्नच माझ्या दोन मुलांनी निकालात काढला आहे.' तसाही हिला सेन्स ऑफ ह्यूमर जरा बेताचा. त्याबाबत वडील पक्के वन – लायनरवाले. हे लक्षात घेऊन एकदा मी हिला सहजच विचारले की, 'हीचं आणि वडिलांचे कसे जमायचे?' विषय टाळण्याचे हीचं कसब फारच भारी. आजपासून तीस वर्षांपूर्वी देहदान करण्याचा फॉर्म भरणारी ही!

दधिची देहदान मंडळाचा नवीन अंक आला की मगच आधीचा अंक रद्दीत देणारी ही. घरात तो अंक ठेवण्याची जागा गेल्या तीस वर्षात बदलू न देणारी ही. तो अंक तिथेच असला की मी वारल्यावर कोणाला फोन करायचा याबाबत गोंधळ नको हे दरवेळी ऐकवणारी ही!

माझ्या वडिलांच्या तेराव्याचे विधी झाले त्या संध्याकाळी माझे असले काहीही करायचं नाही असं सांगणारी ही. अन्न – पाण्याचे महत्त्व कळण्यासाठी तरी उपास कर असं सांगणारी ही.

लिहिता – वाचताना भूक लागली आहे असं हिला आमच्या लहानपणी जरी सांगितले तरी, 'लिहिता – वाचताना तहान – भूक विसरली गेली पाहिजे रे.' असलं भारी तत्त्ववाली ही! जिला कशावरही आंधळे प्रेम करताच आलं नाही हा दोष आयुष्यभर उजळपणे मिरवणारी ही. स्वतःच्या घराच्या रेतीच्या प्रत्येक दगडाची, सिमेंटच्या प्रत्येक कणाची, रंगाच्या प्रत्येक थेंबाची सर्वार्थाने ती मालकीण होती! ना ती स्वतः ते कधी विसरली ना कधी ते तिने दुसऱ्याला विसरू दिले!!

दुखावलेली अस्मिता अस्तित्व कसे झन्कारून टाकते याचं उदाहरण म्हणजे ही 'जिद्द-शिखा.'

**– चंद्रशेखर टिळक**
उपाध्यक्ष, एन एस डी एल, मुंबई.

---

या जगात मृत्यू आणि कर याशिवाय कुठल्याही गोष्टीची खात्री देता येणार नाही. – बेंजामिन फ्रँकलीन

# सण आणि आरोग्य
## गणेशोत्सव

*भारतीय सण व उत्सव साजरे करण्यामागे असलेली तात्विक व आरोग्यविषयक दृष्टी विशद करणारे डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी यांचे हे सदर – संपादक*

श्रावण महिना संपला आणि गणपतीच्या आगमनाची आपण आतुरतेने वाट पाहतो. त्यांच्या स्वागताची तयारी झालेली असते.

गणेशोत्सव म्हणजे बालगोपाळांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना आवडणारा उत्सव ''उत्सवप्रियः खलु मनुष्यः'' या उत्सवामुळे मनाची मरगळ दूर होते. रोजच्या रूक्ष जीवनरहाटीतून थोडी मुक्तता मिळते. मनामध्ये उत्साह निर्माण होतो आणि रसिकता टिकूवन ठेवण्याचे काम हा उत्सव करतो. या उत्सवामुळे समाजात एकी निर्माण होते आणि दहा दिवस अगदी जिकडेतिकडे प्रसन्न वातावरण असते आणि प्रत्येकाच्या मनात भक्तीची भावनाही निर्माण होते.

भारतीयांच्या प्रत्येक उत्सवामागे शास्त्र दडलेले आहे. ते समजून घेऊन जर आपण उत्सव साजरे केले तर ते मनुष्याला संस्कारी आणि उन्नत बनवतात. प्रत्येक उत्सव जीवन-विकासात उपयोगी असे संदेश देतात.

गणेश चतुर्थी हा आपला गजप्रमुख कसा असला पाहिजे ते सांगते. गणपतीचे मस्तक हत्तीचे आहे. हत्ती हा बुद्धिमान प्राणी आहे. गणपतीचे कान सुपासारखे आहेत. सूप धान्य पाखडून त्यातील कचरा खडे या त्याज्य वस्तू बाहेर टाकते. आणि चांगले धान्य सुपात राहते. त्यामुळे सर्वांचे ऐकावे, पण चांगल्या गोष्टी ग्रहण करून वाईट गोष्टी सोडून द्याव्यात.

डोळे बारीक आहेत. आपणही आपल्या जीवनात सूक्ष्म दृष्टी ठेवली पाहिजे. सूक्ष्म दृष्टी म्हणजेच दूरदृष्टीची असावी.

गणपतीचे नाक लांब म्हणजे कोणत्याही गोष्टीचा गंध त्याला लगेच येतो. आजूबाजूच्या गोष्टीचा सुगावा त्याला लगेच आला पाहिजे.

गणपतीला दोन सुळे असतात. एक पूर्ण आणि एक अर्धा. पूर्ण सुळा श्रद्धेचा आणि अर्धा सुळा बुद्धिचा. बुद्धी थोडी कमी असली तरी चालले पण स्वतःवर कमी विश्वास चालणार नाही.

गणपतीला चार हात आहेत. एका हातात अंकुश दुसऱ्या हातात पाश, तिसऱ्या हातात मोदक आणि चौथ्या हाताने आशीर्वाद देत आहे.

अंकुश – विषयवासनांवर संयम

पाश – गरज पडताच इंद्रियांना किंवा अनुयायांना शिक्षा देण्याचे सामर्थ्य

मोदक – जो मोद म्हणजे आनंद देतो, समाधान देतो असा सात्विक आहार असला पाहिजे.

लंबोदर आहे. ऐकलेल्या सर्व चांगल्या वाईट गोष्टी पोटात साठवून ठेवतो. त्याचे पाय लहान आहेत. त्यामुळे त्याची चाल धीमी आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये उतावीळपणा नाही. हळूहळू पुढे जाण्याचे काम सुदृढ आणि सफल होते.

गणपतीचे वाहन उंदीर आहे. तो घराघरात प्रवेश करू शकतो.

गणपतीची षोडशोपचारे पूजा केली जाते. त्यात शुद्धोदक, पंचामृत, धूप, दीप, फूल, पत्री, फळ यासर्व गोष्टी समर्पित केल्या जातात. प्रत्येकाचे वेगळे महत्त्व आहे.

१) पंचामृत – यात दूध, दही, तूप, साखर, मध या पाच गोष्टी येतात.

दूध – मधुर, स्निग्ध, बृहण (मांसधातू वाढवणारे) सर्व धातूंची वाढवणारे वृष्य (शुक्रधातू वर्धक) जीवनीय (रक्त वाढवणारे) श्रमाहर (श्रमाचा परिहार करणारे) रक्तपित्तनाशक मेध्य (बुद्धी वाढवणारे) सर्वसात्म्य म्हणजे सर्वांना उपयोगी आहे. दीपन–भूक वाढविणारे आहे.

दही – दही उष्ण, स्निग्ध, किंचित जड, गोड, आंबट, तुरट चवीचे असते. दही बल, वीर्यवर्धक आहे. भूक वाढविणारे आहे. मूत्र कृच्छ्र (लघवी साफ न होणे) अरुचि तोंडाला चव नसणे, दुर्बलता यात हितकारक आहे.

तूप – स्निग्ध, लघु (पचायला हलके), भूक वाढवणारे बुद्धी, स्मृती आणि धारणाशक्ती वाढवणारे आहे. बल्य, शुक्रधातू वाढवणारे, डोळ्याला हितकर आहे.

साखर – मधुर, स्निग्ध, शीत, लघु असते. शुक्रवर्धक, बल वाढविणारी अशी आहे.

मध – लघु रुक्ष, मधुर असून लेखन करणारा आहे. चक्षुष्य डोळ्यांना हितकर आहे. त्रिदोषशामक आहे. अग्निवर्धक म्हणजे भूक वाढवणारा आहे. शरीरात सूक्ष्म भागांमध्ये जाणारा रुची उत्पन्न करणारा आहे. जुन्या जखमा भरून आणतो.

आपण गणतीला ज्या पत्री वाहते त्याविषयी पाहू. दुर्वा ही गणपतीला वाहिली जाणारी महत्त्वाची पत्री. दुर्वेची महती वैदिक काळापासून सांगितली आहे. दुर्वा वाहताना जो पौराणिक मंत्र म्हटला जातो त्यावरून हे स्पष्ट होईल.

'त्वं दुर्वेह्यऽमृत जन्मांस वंदीताऽसि सुरैरपि सौभाग्य संततीकारी सर्वकार्येषु शोभना।''

ही दुर्वा अमृताप्रमाणे आहे. संतती देणारी आहे.

''गर्भोत्पत्ती स्थैर्यवृद्धिकरं दिव्यंः सुखप्रदम्।''

दुर्वा ही गर्भोत्पत्ती करणारी आणि गर्भाला स्थिर करणारी आहे. तसेच ती रक्तस्तंभक आणि बुद्धिवर्धक आहे. दुर्वाचा रस कडू, तुरट आणि मधुर असून ती कफपित्तानाशक आहे. शीत, लघु गुणाची असल्यामुळे दाहशामक मलसंग्राहक आहे.

गणपती ही बुद्धिची देवता आहे. म्हणूनच बुद्धिदाता गणेशाच्या पूजेत दुर्वेचा पहिला मान आहे. बुद्धिवर्धनाबरोबरच दुर्वेच्या इतर गुणांमुळे ती खालील रोगात विशेष उपयोगी आहे.

विषमज्वर – ताप वाढतो. अंगाचा दाह होतो. तेव्हा ती दाहशामक काम करते.

शीतपित्त, रक्तपित्त, घोळाणा फुटणे या रोगात रक्तस्तंभक म्हणून काम करते. तसेच या गुणधर्मामुळे ती रक्तातिसार, रक्तजप्रवाहिका, रक्तप्रदर, उल्टी होणे, गर्भस्राव, गर्भपात या विकारात उपयोगी पडते. गर्भाशयास शक्ती देते. गर्भाचे पोषण करते.

सदाह, वारंवार मूत्रप्रवृत्ती, सरक्त, मूत्र यात दुर्वास्वरस खडिसाखरेबरोबर दिल्यास लघवी साफ होते. डोके दुखी, त्वचाविकारावर उपयोगी आहे. भाजलेल्या आणि जुन्या जखमांवर उपयोगी आहे.

आघाडा : उष्ण, तीक्ष्ण, कटु, दीपन, पाचन, पित्तविरेचक, मूत्रजनन, कफहन, कृमिहन, विषघ्न आहे. दात दुखी, कावीळ, रातांधळेपणा, पोटदुखी, खोकला यावर उपयोगी. पोट दुखीवर आघाड्याची पाने चावून खातात किंवा आघाड्याचा रस घेतात. खोकला झाल्यास आघाड्याचे चूर्ण व मिरी समभाग घेऊन मधातून चाटण देतात. सर्दी, खोकला, नाक चोंदणे, नाकातील हाड वाढणे यात आघाड्याचे बी, सैंधव, मेंदीपाने, जाईची पाने यांनी तेल सिद्ध करून ते तेल दिवसातून २–३ वेळा नाकात टाकल्यास सर्दी आटोक्यात येते.

आघाड्याच्या तुऱ्यापासून वा मूळापासून विंचवाची विषबाधा, डोळे येणे आदींवर उपयोगी औषधे तयार

केली जातात. बाजारात मिळणारी औषधे. अपमार्गक्षर, फलत्रिकादी काढा.

शमी : प्रामुख्याने ही पत्रीही गणपतीला वाहिली जाते. दुर्वांप्रमाणेच शमी शरीरातील उष्णता घालवण्यासाठी शमीच्या फुलांचा आणि पानांचा रस जिरे व खडिसारखेसोबत घ्यावेत. उष्णतेमुळे आगपेण होते त्यावर शमीचा पाला दह्यात वाटून त्याचा लेप करतात. नखदंतविषावर शमी, कडूनिंब आणि वड यांची साल वाटून लेप करतात. अतिसारावर शमीची साल ताकात उगाळून देतात, शरीरावर जखमेचे व्रण राहिल्यास शमीच्या झाडाची साल उगाळून लेप लावतात. धुपणीवर शमीच्या कोवळ्या शेंगा व जास्वंदीच्या कळ्या तुपात परतून दुधातून देतात. शमीच्या शेंगामुळे केशनाश होतो म्हणून अनावश्यक केस काढण्यासाठी त्याचे चूर्ण चोळतात. गर्भपात होऊ नये यासाठी शमीची फुले कुटून खडीसाखरेबरोबर गर्भिणीला देतात. या पत्रीचे औषधी उपयोग सांगितले आहेत. ते बहुतेक आजार या भाद्रपद महिन्यात होतात. कारण पाऊस कमी झालेला असतो आणि उन्हाचा चटका बसतो. त्यामुळे वातावरण बदलते आणि हे त्रास होतात.

गणपतीला आवडत्या फुलांमध्ये पहिला कमळाचा नंबर लागतो आणि त्यानंतर जास्वंद.

कमळ - कमळाचे फूल शीत, दाह प्रशमन, हृदय वल्प, हृदय संरक्षक, रक्तसंग्राहक, महाजनन, मूत्रविरंजनीय आणि ग्राही आहे. रक्तपित्त, ज्वर, मूत्रकुच्छ्र आणि अतिसार या रोगांमध्ये कमळांचा उपयोग होतो. तीव्र ज्वरात हृदयगती वाढलेली असताना कमल फाष्ट खडिसाखरेसोबत दिला तर हृदयगती सामान्य होऊन हृदयाला बल मिळते. सगर्भावस्थेत रक्तस्राव सुरू झाला तर कमलफाष्ट दिल्यास लगेच बंद होतो.

जास्वंद - ग्राही, रक्तसंग्राहक, केश्य, हृद्य आणि मेध्य आहे. याचा उपयोग प्रदर, प्रमेह आणि ज्वर या रोगातही होतो. याचे फळ गोमूत्रात वाटून त्याचा लेप डोक्यावर दिल्यास टक्कल कमी होते. केस वाढतात. ताज्या फुलांना वाटून त्याचा लेप लावल्यास केसांना सुंदर रंग येतो. फुलांच्या १०-१२ दुधात वाटून पिल्यास रक्तप्रदर कमी होतो याचे सरबत हृदय दौर्बल्य, मस्तिष्क दौर्बल्य उन्माद आणि पित्तन ज्वरात उपयोगी आहे. याची पाने चघळल्यास तोंड येणे कमी होते.

गणपतीचं आवडतं फळ डाळिंब. हे फळ गोड असून त्रिदोषघ्न आहे. रुची वाढवणारे, तहान कमी करते, ग्राही-मलप्रवृत्ती घट्ट करणारे आहे. त्यामुळे अरुचि, अम्लपित्त, प्रवाहिक कृती या विकारात उपयुक्त. नाकातून रक्त येत असल्यास डाळींब फुलाचा रस नाकात टाकतात. डाळिंब मेंदूला शक्तिदायक. मेद्य म्हणजे धारणाशक्ती वाढवणारे आहे. मेंदूच्या दौर्बल्यात याचा उपयोग होतो. याशिवाय हृद्रोग, अम्लपित्त, मूत्रकृच्छ्र, ज्वर, दौर्बल्य रक्ताल्पता, अशक्तपणा यातही डाळींब उपयोगी आहे. बाजारात दाडिमावेलह, दाडिमादिघृत, दाडिमाष्टक ही औषधे उपलब्ध आहेत.

पूजेनंतर गणपतीला पंचखाद्याचा नैवेद्य दाखवला जातो. या पंचखाद्यात 'ख' या अक्षराने सुरू होत असणाऱ्या पदार्थाचा समावेश होतो. खारीक, खोबरे, खिसमिस, खडिसाखर, खसखस हे पंचखाद्यही बलवर्धक आणि बुद्धिवर्धक आहे. मुलांची बुद्धी आणि स्मृती वाढवण्यासाठी मुलांना रोज हे पंचखाद्य दिलेच पाहिजे. याशिवाय त्याचे इतरही औषधी उपयोग पाहू.

खारीक - कोणत्याही धार्मिक पूजेत खारकेला फार महत्त्व आहे. तेवढेच महत्त्व आयुर्वेदात त्यांचा शरीरावरील परिणाम पाहून वर्णन केले आहे. पिकलेल्या फळांना खजूर म्हणतात. आणि सुक्या फळांना खारीक म्हणतात. खारीक पौष्टीक म्हणून काम करते. उत्तम प्रतीची खारीक घेऊन त्यातील बी काढून त्या कुटून त्यात बदाम, पिस्ता चारोळी घालून तूपासोबत खाल्ल्यास अशक्तपणा दूर होतो. हाडांची झीज भरून येते. सांधेदुखी कमी

एकांतवासात नेहमी बुद्धीचे संगोपन होते; पण चारित्र्याचे संगोपन जगाच्या वादळातच होते. - अलेक्झांडर स्मिथ

होते. त्याचप्रमाणे खारीक, तूप, साखर दुधात घालून दूध उकळून घेतल्यास जीर्ण तापात त्याचा उपयोग होतो. खजूर रात्री पाण्यात भिजवून सकाळी कुस्करून गाळून घेतल्यास मलावरोध कमी होतो. पचनशक्ती चांगली नसेल तर खजूर रोज खाल्ल्यास उत्तम पौष्टिक म्हणून उपयोगी होतो. खजूराची चटणी खाल्ल्यास तोंडाला चव येते. भूक चांगली लागते. खजूर, मनुका, साखर, तूप, पिंपळी, मध समभाग घेऊन चाटण सेवन केल्यास स्वरभेद (आवाज बसणे) क्षमाचा खोकला या तक्रारी दूर होतात. लहान मुलांच्या घूटीतही खारकेचा समावेश केला आहे. त्यामुळे बाळाची भूक वाढते आणि त्याला बलही मिळते.

दारुचे व्यसन सुटण्यासाठी खर्जूरासव नावाचे औषध असून हळूहळू दारुचे व्यसन कमी करता येऊ शकते. गर्भिणीने खजूर खाऊन दूध पिल्यास गर्भाची वाढ चांगली होते व मूल गुटगुटीत होते.

खोबरे – नारळ यालाही सर्व धार्मिक पूजेमध्ये महत्त्व आहे. त्यात ओले खोबरे तब्येतीला फार चांगले असते. अशक्त माणसाला धष्टपुष्ट करण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो. किसलेले खोबरे चांगल्या तूपात भाजून त्यात साखर आणि नारळाचे पाणी घालून शिजवून नारळीपाक तयार करावा. अम्लपित्त, उल्टी, क्षय यामध्ये हा नारळीपाक खाण्यात द्यावा. गूळ आणि खोबरे चावून खाल्ल्यास कृश शरीरातील हाडांची वाढ होते चरबी वाढते. जेवणानंतर पोटात दुखणे, फुगणे, मलावरोध या तक्रारी असल्यास कोवळे खोबरे खावे. खोबरेल तेलाचा उपयोग काही प्रदेशात खाण्यासाठी करतात. केस, मुलायम, चमकदार होण्यासाठी या तेलाचा उपयोग होतो. आवळा, जास्वंद, काळे तीळ, माका यांनी सिद्ध केलेले खोबरेल तेल केसांना लावल्यास केस गळणे, पिकणे या तक्रारी नाहीशा होतात. नारळाच्या करवंटीपासून काढलेल्या तेलाचा उपयोग सांधेदुखीवर होतो. ओल्या नारळाचे मोदक बल, पुष्टीदायक आणि बुद्धिवर्धक ही आहेत. जुन्या जखमा भरुन येण्यासाठीही खोबरेल तेलाचा उपयोग होतो.

खिसमिस – द्राक्षे वाळल्यानंतर त्यांना खिसमिस म्हणतात त्यांनाच मनुकाही म्हटले जाते. काळी द्राक्षे वाळवल्यानंतर काळ्या मनुका तयार होतात. मलावरोधाचा त्रास आहे. त्यांनी या काळ्या मनुका खाल्यास शौचास साफ होते आणि वेदनाही कमी होतात. काळ्या मनुका रक्तवर्धक, कासनावाफ आहेत. मांसवर्धक, शुक्रवर्धक असून रुची उत्पन्न करणाऱ्या आहेत. यकृतविकार, कावीळ, उलटी, तोंडाचा कडवटपणा, आवाज बसे, चक्कर येणे या तक्रारींवरही मनुकांचा चांगला उपयोग होतो. क्षय, ताप, खोकला, अशक्तपणा, भूक मंदावणे यात मनुकांपासून तयार केलेले द्राक्षासव परिणामकारक ठरते.

खडिसाखर – मधुर रसाची लघु पौष्टिक, डोळ्यांना हितकर स्निग्ध, धातुवर्धक, शीत, वृस्य, तृष्णाशामक, रक्तपित्तनाशक, पित्त, दाह, शोष यांचा नाश करते. तोंडास कडवटपणा घशाशी आंबट येत असेल तर सुंठपावडर आणि खडी साखर एकत्र करून खावे. खोकल्याची ढास लागत असेल तर खडिसाखर, काळ्या मनुका, ज्येष्ठमध यांचा काढा करून घ्यावा. आयुर्वेदात सितोलादी चूर्ण, तालिलादी चूर्ण, अविपत्तिकर यात खडिसाखरेचा उपयोग केला आहे.

खसखस – अफूचे बी म्हणजे खसखस. खसखस पौष्टिक आणि निद्राजनन आहे. बाळंतिणीला खसखशीची खीर देण्याची पद्धत आहे. त्यामुळे तिचा अशक्तपणा कमी होतो. दूध भरपूर येत आणि झोपही शांत लागते.

असा हा देवाचा पंचखाद्याचा नैवेद्य बलपुष्टीवर्धक आणि बुद्धिवर्धकही असल्यामुळे त्याचा केवळ गणेशोत्सवात उपयोग न करता दैनंदिन व्यवहारातही उपयोग करू या आणि आपली पुढची पिढी बलशाली आणि बुद्धिमान करू या.

**– डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

●●●

---

जर सर्वत्र परोपकाराचा फैलाव झाला, तर पृथ्वीचे स्वर्गात रूपांतर होईल आणि नरक ही एक दंतकथा गणली जाईल. – सी. सी. कॉल्टन

# 'कैलासराणा शिवचंद्रमौळी'

## भाग : ३

*भगवान शिवाचे महात्म्य व बारा ज्योतिर्लिंगांविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

येथे आपण महादेवाच्या 'पिनाक' धनुष्याचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे आपण हिंदू धर्म-ग्रंथांमध्ये उल्लेख आलेल्या इतर दिव्य धनुष्यांविषयी थोडक्यात जाणून घेऊ या. हिंदू धर्मग्रंथांमध्ये उल्लेख आलेल्या इतर देवतांची व वीरांची नावे व त्यांची धनुष्ये पुढीलप्रमाणे आहेत. भगवान विष्णू - शारंग धनुष्य, दानवीर व शूरवीर कर्ण - विजय धनुष्य, परशुराम - पिनाक धनुष्य, अर्जुन - गांडीव धनुष्य. आपण पाहिले की, भगवान विष्णूच्या धनुष्याचे नाव शारंग असे होते. दक्षिण भारतात म्हणजेच सध्याची तेलंगाणा, आंध्रप्रदेश, तामीळनाडू व केरळ ह्या राज्यांमध्ये शारंग धनुष्याचा उल्लेख कोडंद असा देखील केला जातो. सुदर्शन चक्र, नारायणास्त्र, वैष्णवास्त्र, कोमोदकी गधा व नंदक तलवार ही भगवान विष्णूची इतर आयुधे वा अस्त्रे होत. कर्ण हा महाभारतातील अतिशय प्रसिद्ध योद्धा होय. आपल्या लक्षात येते की, खऱ्या अर्थाने तो पांडव होता. मात्र, त्याच्या जन्माच्या कथेवरून आपल्याला कळते की, तो कुंतीपुत्र असूनही त्याला पांडव म्हणून सन्मान मिळाला नाही व तो महाभारत युद्धात कौरवांच्या बाजूने लढला. कर्ण हा परशुरामाचा शिष्य होता. मात्र कर्णाने परशुरामाला तो ब्राह्मण असल्याचे सांगून शस्त्रविद्येचे ज्ञान प्राप्त केले होते. जेव्हा परशुरामाच्या हे लक्षात येते तेव्हा परशुराम क्रोधीत होतात व कर्णाला शाप देतात की, जेव्हा त्याला ब्रह्मास्त्राची सर्वात जास्त गरज असेल तेव्हा तो 'ब्रह्मास्त्र' विसरेल. परंतु नंतर परशुरामाला कर्णाला हा शाप दिल्याबद्दल व त्याच्यावर अन्याय केल्याबद्दल वाईट वाटते व ते आपले 'विजय' हे धनुष्य कर्णाला देतात. आपणास हिंदू धर्मग्रंथांमधून अशी माहिती मिळते की, विजय हे धनुष्य विश्वकर्म्याने घडविलेले असून ते महादेवाचेच धनुष्य मानले जाते. महादेवाने इंद्राला विजय धनुष्य जपून ठेवण्यास सांगितलेले असते व नंतर महादेव ते धनुष्य परशुरामाला देतात. परशुराम ते धनुष्य कर्णाला देतात. परशुराम कर्णाला असाही वर देतात की, जोपर्यंत 'विजय' हे (महादेवाचे) धनुष्य कर्णाच्या हातात असेल तोपर्यंत कर्णाचा कोणीही पराभव करू शकणार नाही. कर्णाने आपल्या विजय ह्या धनुष्याचा वापर कुरुक्षेत्र (महाभारत) युद्धात केलेला आढळतो व त्याने आपल्या 'विजय' ह्या धनुष्याच्या सहाय्याने जेव्हा 'भार्गव' अस्त्राचा (भार्गवास्त्र) वापर केला तेव्हा अर्जुन व श्रीकृष्णाला रणांगणावरून माघार घ्यावी लागली होती अशी महाभारतातील कथा आपणास ऐकावयास मिळते. येथे आपण अर्जुनाच्या 'गांडीव' धनुष्याचा देखील उल्लेख केला. आपणास ठाऊकच आहे की, अर्जुन हा पांडव होता व तो त्याकाळातील सर्वश्रेष्ठ धनुर्धरांपैकी एक होता. 'गांडीव' ह्या धनुष्याचे निर्माण साक्षात ब्रह्मदेवाने केले होते व ते 'अग्नी' ह्या देवाचे धनुष्य होते. महाभारतातील अशी एक कथा सांगितली जाते की, अग्निची खांडव वनाचा नाश करण्याची इच्छा अर्जुन पूर्ण करतो व नागवंशाचा जवळपास संपूर्ण नाश करतो तसेच अर्जून नागांचा राजा तक्षकाचादेखील पराभव करतो. तेव्हा अग्नी प्रसन्न होऊन अर्जुनाला आपले गांडीव धनुष्य व बाणांची दोन दिव्य भाती देतो. ही भाती दिव्य असल्यामुळे त्यातील बाण कधीच संपत नसतात. अर्जुनाने गांडीव धनुष्याच्या सहाय्यानेच महाभारतातील अनेक मोठ्या योद्ध्यांचा पराभव केलेला आढळतो. महाभारताचे युद्ध संपल्यावर

पावित्र्यामुळे अत्यंत गलिच्छ जगात देखील आत्म्याला स्वच्छ हवा लाभते. - जोबर्ट

स्वर्गारोहणापूर्वी अर्जुन अग्निच्या सांगण्यावरून 'गांडीव' धनुष्य समुद्रात / सागरात टाकून देऊन ते देवांना परत करतो, अशीही कथा सांगितले जाते.

अध्यात्माचा वापर करून विविध व्याधी बऱ्या करणाऱ्या वा असे जे एक क्षेत्र सध्या नावारुपाला आले आहे त्या क्षेत्रातील एक तज्ज्ञ नीता सिंघल यांनी भगवान शिवाच्या अजून काही अस्त्रांचा व आयुधांचा उल्लेख केला आहे. ही अस्त्रे म्हणजे 'तीन बाण', 'त्रिशूल', 'महेश्वरास्त्र' व 'रुद्रास्त्र' ही होत. यापैकी 'तीन बाण' म्हणजे ह्या बाणांची संख्याच तीन असते– हे भगवान शिवाने 'बर्बरिक' (इंग्रजीत Barbarik) यास दिलेले असतात. बर्बरिक हा भीमाचा नातू असतो. घटोत्कच हा त्याचा पिता तर मौरवी (काही ठिकाणी हिचा उल्लेख नागकण्या अहिलावती असा येतो) ही त्याची माता असते. कुरुक्षेत्राच्या युद्धापूर्वी कृष्ण जेव्हा पांडवांच्या गटातील योद्ध्यांना विचारतो की, कुरुक्षेत्राचे युद्ध किती दिवस चालू शकेल. तेव्हा बर्बरिक म्हणतो की, तो हे युद्ध काही क्षणात संपवू शकतो. म्हणजेच तो काही क्षणांत कौरवांचा पराभव करू शकतो. तेव्हा कृष्ण त्याला तो हे कसे काय करू शकेल असे विचारतो. त्यावेळी बर्बरिक उत्तर देतो की, तो शिवभक्त असल्यामुळे त्याने एकदा भगवान शिवाची तपश्चर्या केली होती व भगवान शिवाने प्रसन्न होऊन तीन दिव्य बाण त्याला दिले होते व तो ह्यातील दोन बाणांच्या सहाय्याने शत्रूला वश करून फक्त एकाच बाणाने शत्रूचा पूर्ण नाश करू शकतो अशी ती कथा आहे. असो. भगवान शिवाचे अजून एक आयुध म्हणजे 'त्रिशूल' हे होय. त्रिशूल आपल्या लक्ष्याचा भेद अचूकपणे तर घेतेच, परंतु भगवान शिवाने त्रिशुलाचा वापर केल्यावर कुठलेही दिव्य अस्त्र वा दिवास्त्र त्यास रोखू शकत नाही अशी माहिती हिंदू धर्मग्रंथांमध्ये दिली असल्याचे आढळते. त्रिशूलाची तीन टोके म्हणजे विश्वाची निर्मिती, पालन–रक्षण व विनाश ह्या तीन गोष्टींचे प्रतीक असल्याची हिंदूंची मान्यता आहे. भगवान शिव तांडव नृत्य करत असताना त्रिशूलाचा वापर करून अवकाश, पृथ्वी व पाताळ नष्ट करू शकतात असे हिंदू मानतात. भगवान शिवाचे अजून एक अस्त्र म्हणजे 'महेश्वरास्त्र' होय. महादेव ह्या अस्त्राचा वापर आपला तिसरा डोळा म्हणजेच 'त्रिनेत्र' उघडून करतात व ह्या अस्त्राचा वापर झाल्यावर संपूर्ण विश्व क्षणार्धात भस्म होऊन जाते असे धर्मग्रंथांमध्ये म्हटले असल्याचे अभ्यासक सांगतात. भगवान शिवाचे अजून एक अस्त्र म्हणजे 'रुद्रास्त्र' हे होय. अकरा रुद्रांपैकी एका रुद्राची पूर्ण शक्ती ह्या अस्त्रात एकवटलेली असल्याची माहिती नीता सिंघल देतात. महाभारतात कर्णाने रुद्रास्त्राचा वापर अर्जुनाविरुद्ध केल्याची माहिती आपणास मिळते. जेव्हा कर्ण रुद्रास्त्राचा आघात अर्जुनावर करतो तेव्हा ह्या अस्त्राने अर्जुनाच्या शरीरावरील शिव–कवच छेदते व अर्जुनाची आपल्या गांडीव धनुष्यावरील पकड कमी होते अशी माहिती आपणास मिळते. भगवान शिवाच्या ह्या सगळ्या अस्त्रांमध्ये दिव्यशक्ती असून ही अस्त्रे क्षणार्धात संपूर्ण विश्वाचा नाश करू शकतात असे हिंदू मानतात. भगवान शिव मात्र, ह्या अस्त्रांचा वापर कधीच दुर्बलांविरुद्ध वा अनाठायीपणे वा विनाकारण करत नाहीत व यांचा वापर करताना कधीही कुणासोबत भेदभाव करत नाहीत असे हिंदू भाविक मानतात. त्यामुळे जेव्हा त्यांच्या भक्तांना त्रास होतो तेव्हाच ते ह्या अस्त्रांचा वापर त्यांच्या भक्तांना उपद्रव करणाऱ्यांविरोधात करतात. तसेच अधर्माचा नाश करण्यासाठी जेव्हा कुणी त्यांची आराधना करतो तेव्हा ते प्रसन्न होऊन ही अस्त्रे त्यांना देतात अशी हिंदूंची भावना असल्याचे कळते. असो.

महाराष्ट्रातील अनेक शिवमंदिरांपैकी अजून एक प्रसिद्ध व ऐतिहासिक शिवमंदिर म्हणजे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील गोंदेश्वर मंदिर होय. हे मध्ययुगीन काळातील महाराष्ट्रातील सुस्वरूपात असलेल्या मंदिरांपैकी एक मंदीर होय असे म्हणावे

---

सकाळच्या हवेमुळे दिवसाची कल्पना करता येते, त्याप्रमाणे बालपणीच्या आयुष्यावरून माणसाच्या जीवनाची कल्पना करता येते. – मिल्टर

लागेल. हे मंदिर महाराष्ट्रात सापडणाऱ्या 'बेसॉल्टच्या' खडकातून काळ्या पाषाणातून बनविले असल्याचे आढळते. हे मंदिर शिवपंचायतनाचे सुरेख उदाहरण होय. याचा अर्थ असा की, येथे एकूण पाच मंदिरे आहेत म्हणून यास 'पंचायतन' म्हटले गेले आहे. अर्थात, प्रमुख मंदिर भगवान शिवाचे असून इतर मंदिरे माता पार्वती, श्री गणपती, सूर्य व भगवान विष्णुची आहेत.

महाराष्ट्रातील पूर्व विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात वैनगंगा नदीच्या तीरावर आणखी एक प्रसिद्ध शिवमंदिर आहे व ह्या मंदिराला मार्कंड महादेव मंदिर असे म्हणतात. येथे देखील अनेक मंदिरे आहेत व अर्थात येथील प्रमुख देवता भगवान शिव असून म्हणूनच शिवाचे मंदिर हे मुख्य मंदिर आहे. इसवी सनाच्या ८ व्या ते १२ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील ह्या प्रदेशांवर राज्य करणाऱ्या राष्ट्रकूट राजवंशाने हे मंदिर निर्माण केल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

दक्षिण भारतातील तमिळनाडूमध्ये भारताच्या पूर्व समुद्र किनाऱ्यावर महाबलीपुरम (मामल्लपुरम्) हे मंदिर आहे वा देव-देवतांची अनेक शिल्पे असलेले ठिकाण आहे. अभ्यासकांचे असे म्हणणे आहे की हे ठिकाण म्हणजे अनेक मंदिरे/देवळे असलेला मंदिर समूह वा परिसर आहे. येथील अनेक वास्तूंचे व शिल्पांचे निर्माण इसवी सनाच्या ७ व्या ते ८ व्या शतकात झाले असावे असा अभ्यासकांचा कयास आहे. मामल्लपुरम् येथील मंदिराचे व शिल्पांचे निर्माण पल्लव राजवंशातील राजा पहिला महेंद्रवर्मन (इसवी सन सुमारे ६०० ते ६३०) याच्या काळात झाले असावे असे तज्ज्ञांचे मत आहे. टोलेमी, मार्को पोलो इत्यादी युरोपियनांनी मामल्लपुरम् येथील मंदिरांचे व शिल्प-मूर्तींचे उल्लेख केलेले आढळतात. मामल्लपूरम येथील ही मंदिर-वास्तू युनेस्कोने 'जागतिक वारसा' म्हणून जाहीर केलेली आहे व सध्या भारताचा पुरातत्त्व विभाग ह्या वास्तूंची देखरेख करत असतो. येथे गंगावतरणाचे शिल्पदेखील साकारण्यात आलेले आहे. महाबलीपुरम् वा मामल्लपुरम् हे शैव पंथीयांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. येथे अर्धनारीश्वर (माता पार्वती व भगवान शिव), हरिहर (भगवान विष्णू व भगवान शिव), स्कंद व भैरव आदींची शिल्पे साकारण्यात आलेली आहेत.

तमीळनाडूतील चिदम्बरम् येथील शिवमंदिर जगभर प्रसिद्ध आहे. 'चिदम्बरम्' ह्या तमीळ शब्दाचा अर्थ ढोबळ मानाने शहाणपणाचे /विद्वत्तेचे वातावरण होतो असे तज्ज्ञांचे मत आहे. येथील नटराज मंदिराच्या गोपुरावर भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील जवळ जवळ १०८ हस्तमुद्रा कोरलेल्या आहेत. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात वर्णिलेल्या नटराज मंदिरातील कोरीव विविध मुद्रांच्या (postures) आधारेच तमीळनाडूतील 'भरतनाट्यम्' ह्या शास्त्रीय नृत्य कलेचा आविष्कार वा निर्मिती झाली असे अभ्यासकांचे मत आहे. आपण अगोदर पाहिल्याप्रमाणे चिदम्बरम्च्या नटराज मंदिराचे निर्माण चोल राजवंशातील राजांनी इसवीसनाच्या १०व्या शतकात केले. हे मंदिर दक्षिण भारतातील अतिप्राचीन मंदिरांपैकी एक गणले जाते व गेल्या हजार वर्षांपेक्षाही जास्त काळापासून भाविक ह्या मंदिरात नटराजाचे वा भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी येत आहेत. येथे सूर्य, गणपती, मुरुगन (कार्तिकेय, दक्षिण भारतात व प्रामुख्याने तमीळनाडूमध्ये कार्तिकेयास मुरुगन असे म्हटले जाते) व भगवान विष्णू आदी देवतांची मंदिरे आहेत. आपणास अशी माहिती मिळते की, येथे महाशिवरात्रीच्या वेळी दरवर्षी 'नाट्यांजली' नामक नृत्याचा कार्यक्रम होतो.

१८ व्या शतकातील म्हैसूरचा (दक्षिण कर्नाटक) शासक टिपू सुलतान याने काही काळ येथील मंदिराच्या आवारात आपले सैन्य ठेवले होते अशी माहिती मिळते. त्याचप्रमाणे ब्रिटिश अधिकारी सर आयरकूट याने १७८२ साली येथील देवालयावर हल्ला केला होता अशी माहिती मिळते. याठिकाणी प्रामुख्याने वैशाख व मार्गशीर्ष महिन्यात संपूर्ण भारत तसेच श्रीलंकेतूनही भाविक मोठ्या संख्येने येत असतात.

---

गरीबांचे वैभव म्हणजे त्यांची मुले. - थॉमस फुल

आपण येथे चिदम्बरम् येथील नटराज मंदिराचा उल्लेख केला, परंतु येथे अजून एक महत्त्वाचा उल्लेख करावासा वाटतो वा माहिती द्याविशी वाटते व ती अशी की, येथील मंदिराच्या आवारात असलेल्या 'चित्सभा' ह्या भवनात 'आकाशलिंग' आहे असे सांगितले जाते. येथे अजून एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट करणे आवश्यक आहे व तो असा की, हिंदू संस्कृतीत हे विश्व व सृष्टी पंचमहाभूतांपासून बनलेली आहे असे मानले जाते. ही पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी (जमीन), जल, अग्नि, वायू व आकाश ही होत. त्यामुळे भारतातील काही ठिकाणी ह्या विविध पंचमहाभूतांच्या स्वरूपातील शिवलिंग आढळतात. त्यापैकीच एक उदाहरण म्हणजे चिदम्बरम् येथील आकाशलिंग होय. हे लिंग पंचमहाभूतांपैकी आकाशाचे प्रतिनिधित्व करते. येथील मंदिराच्या आवारात चित्सभा, कनकसभा, नृत्यसभा, देवसभा व राजसभा ही भवने असल्याची माहिती मिळते व यापैकीच नृत्यसभेत नटराजाची मूर्ती असल्याचे आढळते. येथे एक तलाव असून त्यातील जलाने नटराजमूर्तीचा अभिषेक केला जातो. येथील मंदिरातील पूजाअर्चा तसेच एकूणच प्रशासन दीक्षितार (Dikshitar) ब्राह्मण पाहत असतात. दीक्षितार ब्राह्मण हे तमीळनाडूत प्रामुख्याने चिदम्बरम्मध्ये आढळतात वा राहतात. हाच ब्राह्मण समाज चिदम्बरम् येथील नटराज मंदिराचा विश्वस्त आहे. दीक्षितार ब्राह्मण हे चोल राजघराण्याचे (राजांचे) राजपुरोहित होते अशी माहिती आपणास मिळते. येथील प्रत्येक दीक्षितार ब्राह्मण विवाह झाल्याबरोबर आपसुकच चिदम्बरम् मंदिराचा विश्वस्त होतो असे म्हणतात. हे ब्राह्मण केरळातील नंबुद्री ब्राह्मणांप्रमाणे डोक्याच्या समोरच्या बाजूला साधारणतः डाव्या बाजूने केसांचा बुचडा बांधतात. हे दीक्षितार ब्राह्मण वेदांत व यज्ञांत निपुण असतात. असे म्हटले जाते की, अगोदर चिदम्बरम् ही चोल राजांची राजधानी होती परंतु कालांतराने पहिला राजेंद्र ह्या चोल राजाने त्यांची राजधानी तंजावर येथे हलवली.

महादेवाशी निगडित दक्षिण भारतातील अजून एक महत्त्वाचे शिवमंदिर म्हणजे गोकर्ण येथील महाबळेश्वराचे मंदिर होय. गोकर्ण हे ठिकाण कर्नाटक राज्यातील उत्तर कानडा जिल्ह्यातील ठिकाण आहे. हे मंदिर कुमठा तालुक्यातील प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. हे मंदिर कारवारपासून (कारवार हे उत्तर कानडा जिल्ह्याच्या मुख्यालयाचे ठिकाण होय) सुमारे ३६ किलोमीटर तर कुमठा बंदरापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असल्याची माहिती आपणास मिळते. हे मंदिर समुद्रकाठी असल्यामुळे फारच मनमोहक व सुंदर वाटते. गोकर्णचे माहात्म्य रामायण व महाभारतासारखी महाकाव्ये, तसेच भागवतपुराण व शिवपुराण ह्या पुराणांमध्ये वर्णिलेले आहे. त्याचप्रमाणे गोकर्णचे स्थळ माहात्म्य वर्णन करणारा गोकर्णमाहात्म्य नावाचा एक वेगळा ग्रंथ देखील आढळतो. येथील महाबळेश्वराचे मंदिर हे द्रविड स्थापत्य शैलीत बांधलेले निदर्शनास येते. द्रविड स्थापत्यशैलीत बांधलेली मंदिरे प्रामुख्याने दक्षिण भारतात आढळतात. ह्या स्थापत्यशैलीत मंदिराची गोपुरे (कळस) उंच असतात व त्यावर साधारणतः हिंदू धर्मातील विविध देव-देवतांच्या मूर्ती कोरलेल्या असतात, तसेच नक्षीकाम केलेले असते. त्याचप्रमाणे मंदिरातील स्तंभांवर नक्षीकाम केलेले असते व 'याली' म्हणजेच गरुड, सिंह व हत्ती या तिन्हींच्या शरिरांचे विविध अवयव असलेले शिल्प कोरलेले असते. आपण वर नमूद केल्याप्रमाणे येथील प्रमुख मंदिर हे भगवान शिवाचे असून त्यास महाबळेश्वर मंदिर म्हणतात. महाबळेश्वरा व्यतिरिक्त येथे ब्रह्म, विष्णू, अगस्ती, राम, ताम्रगौरी, गणपती इत्यादी देवतांची देखील मंदिरे आहेत. येथील अजून एक वैशिष्ट्य म्हणजे येथे रावणाचे सुद्धा मंदिर आहे. हे ठिकाण लिंगायत ह्या शैव पंथीय लोकांसाठी फारच महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे.

गोकर्णविषयी आपणास एक कथा ऐकावयास मिळते व ही कथा अशी की, लंकेचा राजा रावणाची आई ही निस्सीम शिवभक्त होती. ती रावणाचा उत्कर्ष

व्हावा यासाठी शिवलिंगाची पूजा करत असे. परंतु देवांचा राजा इंद्र ह्याला ही गोष्ट रुचत नाही व तो रावणाची आई ज्या शिवलिंगाची पूजा करत असते ते शिवलिंग समुद्रात फेकून देतो. त्यामुळे रावणाच्या आईच्या पूजेत वा भगवान शिवाच्या आराधनेत खंड पडतो व व ती अन्नपाणी सोडून देते. तेव्हा तिचा पुत्र लंकेचा राजा रावण तिला आश्वासन देतो की, तो स्वतः कैलास पर्वतावर जाईल व तेथून आत्मलिंग (शिवलिंग) आणेल व त्याची प्रतिष्ठापना लंकेत करेल, जेणेकरून त्याच्या आईला पुन्हा महादेवाची आराधना करणे सुकर ठरेल वा शक्य होईल. अशा प्रकारे रावण कैलासावर जातो व तेथे महादेवाची खडतर तपश्चर्या करतो. तसेच तो महादेवाला प्रसन्न करण्यासाठी सुमधुर गाणी/गीते गातो व आपल्या त्वचेपासून व आतड्यांपासून बनविलेल्या तनूंपासून (धागा) वीणा बनवितो, जेणेकरून ह्या वीणेचे वादन करून भगवान शिवाला प्रसन्न करता यावे. रावण एवढे करून थांबत नाही तर तो आपल्या शिरांचीदेखील आहुती देतो. तेव्हा भगवान शिव त्याला प्रसन्न होतात. परंतु आत्मलिंग लंकेत जाऊ नये यासाठी नारदाच्या सांगण्यावरून भगवान विष्णू रावणाला आत्मलिंगाऐवजी भगवान शिवाजवळ एक सुंदर स्त्री मागण्याची दुर्बुद्धी देतात. भगवान शिव रावणाची ही इच्छा पूर्ण करतात व साक्षात माता पार्वतीला रावणाला देतात. त्यानंतर रावण माता पार्वतीला कैलासावरून घेऊन लंकेकडे येण्यास निघतो. मात्र, माता पार्वतीला रावणासोबत जावे लागले याचे वाईट वाटून नारदमुनी रावणाला अर्ध्या वाटेतच भेटतात व सांगतात की, भगवान शिवाने त्याला खरी पार्वतीमाता दिलेली नाही. त्यानुसार रावण पार्वती मातेला तेथेच सोडून (कर्नाटकातील लोक मानतात की, ते ठिकाण म्हणजे गोकर्णच होय) पाताळात जातो व तेथील एका स्त्रीला पार्वतीमाता समजून तिच्याशी विवाह करतो व तिला लंकेला घेऊन जातो. रावण लंकेला आल्यावर त्याची आई त्याला शिवलिंगाविषयी विचारणा करते. तेव्हा रावणाला आपली चूक उमगते व तो पुन्हा एकदा कैलास पर्वतावर जातो व यावेळेस महादेवाला प्रसन्न करून आत्मलिंगाची मागणी करतो. भगवान शिव त्याची ही इच्छा पूर्ण करतात, मात्र एक अट घालतात. ही अट अशी की, रावणाने आत्मलिंग वाटेत कुठेही जमिनीवर ठेऊ नये. अन्यथा आत्मलिंग जेथे ठेवले जाईल तेथेच ते कायमस्वरूपी स्थित होईल. रावण जेव्हा आत्मलिंग घेऊन गोकर्ण येथे पोहोचतो त्यावेळी भगवान विष्णूने सूर्याला झाकोळून टाकून संध्याकाळचे वातावरण निर्माण करतो. त्यामुळे रावणाला संध्या करणे आवश्यक वाटते. परंतु त्याच्या हातात आत्मलिंग असल्याने तो ते करू शकत नव्हता. त्यावेळी साक्षात गणपती गुराख्याच्या रूपात तेथे प्रकट होतो. रावण गुराख्याच्या रुपातील गणपतीला तो संध्या करीपर्यंत आत्मलिंग धरण्याची विनंती करतो. गुराखी (गणपती) रावणाला म्हणतो की, 'त्याने हाका मारल्यावर रावणाने लागलीच यावे' व ह्या अटीवर तो आत्मलिंग आपल्याकडे घेतो. रावण अशातऱ्हेने आत्मलिंग गुराख्याकडे देऊन संध्या करण्यासाठी वा सायंकाळचे धार्मिक विधी करण्यासाठी सिद्ध होतो. त्यानंतर आत्मलिंगाचे वजन न पेलवले गेल्यामुळे गणपती रावणाने यावे यासाठी दोन-तीन हाका मारतो परंतु रावण वेळेत येत नाही. त्यामुळे गुराखी म्हणजेच गणपती ते आत्मलिंग जमिनीवर ठेवतो व आत्मलिंग तेथेच कायमस्वरूपी स्थित होते. गणपती आत्मलिंग जेथे ठेवतो ते ठिकाण म्हणजेच गोकर्ण होय असे कर्नाटकातील लोक मानतात. यानंतर गुराख्याच्या रुपातील गणपती आपल्या गायींसह तेथून लुप्त पावतो. तेव्हा रावणाला एक शेवटची गाय जमिनीत जाताना वा शिरताना दिसते. तेव्हा रावण त्या गायीचे कर्ण म्हणजेच कान धरून तिला बाहेर ओढण्याचा प्रयत्न करतो. कारण त्या गायीच्या शरीराचा सर्व भाग जमिनीत गेलेला असतो व तिचा फक्त कानच वर राहिलेला असतो, म्हणजेच तो कान आत जाण्यापूर्वीच रावण त्या कानाला ओढण्याचा प्रयत्न करतो. त्या गायीच्या कानाच्या (कर्णाच्या) ह्या कथेवरूनच ह्या

ठिकाणाला 'गोकर्ण' असे नाव पडले आहे. तसेच समुद्रकाठाने ह्या गावाकडे पाहिल्यावर हे गाव गायीच्या कानासारखे दिसते. त्यामुळेदेखील ह्या ठिकाणाचे नाव गोकर्ण पडले असावे असे म्हटले जाते. असो. तर रावणाने या ठिकाणी जमिनीवर ठेवलेले आत्मलिंग खूप बळ लावून उचलण्याचा अथक प्रयत्न केला. परंतु तो ते आत्मलिंग उचलू शकला नाही. त्यामुळे येथील आत्मलिंग 'महाबळेश्वर' या नावाने ओळखले जाऊ लागले अशी कथा सांगितली जाते.

गोकर्णविषयी आपणास अजून एक कथा ऐकावयास मिळते व ही कथा अशी की, गोकर्ण ते कन्याकुमारी (म्हणजेच सध्याच्या उत्तर कर्नाटकापासून ते तमीळनाडूमधील कन्याकुमारीपर्यंत, अर्थात यात केरळाचादेखील समावेश होतो) पर्यंतची भूमी परशुरामाने निर्माण केली. हिंदू धर्मग्रंथांमधून आपणास माहिती मिळते की, परशुराम हा भगवान विष्णूचा सहावा अवतार मानला जातो. परशुरामाने भगवान शिवाची तपश्चर्या केली होती व प्रसन्न होऊन भगवान शिवाने त्याला 'परशु' (कुऱ्हाड) हे शस्त्र दिले होते. परशुराम हा जमदग्नी ऋषी व रेणुका मातेचा पुत्र असतो. एकदा कर्तविर्याजुन नामक बलशाली राजाला जमदग्नी ऋषींच्या आश्रमातील कामधेनू गाय बळजबरीने न्यावयाची असते. परंतु जमदग्नी ऋषी त्याला कामधेनू घेऊन जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करतात तेव्हा कर्तविर्याजून राजा जमदग्नी ऋषींना जीवे मारतो (ठार करतो). परशुरामाला हे कळल्यावर तो क्रोधीत होतो व तो कर्तविर्याजुनाचा वध करतो. एवढेच नव्हे तर, तो एकवीस वेळा सर्व क्षत्रिय कुळाचा नाश करतो वा नष्ट करतो. क्षत्रियांचा एकवीस वेळा नाश केल्यानंतर परशुराम गोकर्ण येथे समुद्रकिनारी प्रायश्चित करतो व त्यानंतर त्याला ब्राह्मणांना भूमीदान करावयाची असते. परंतु तेथे समुद्र असल्यामुळे भूमी उपलब्ध नसते. तेव्हा परशुराम वरुणास (समुद्राची देवता, ह्या देवतेस पर्जन्यदेवता देखील म्हणतात.) भूमी उपलब्ध करून देण्याची विनंती करतो. वरुण परशुरामाला म्हणतो की, परशुरामाने गोकर्णपासून दक्षिणेच्या दिशेने त्याचा 'परशु' फेकावा/भिरकवावा व परशुरामाचा परशु जेथपर्यंत जाईल तेथपर्यंत समुद्राचे पाणी मागे जाऊन भूमी वा जमीन निर्माण होईल. त्यानंतर परशुराम ही भूमी ब्राह्मणांना दान म्हणून देऊ शकेल. वरुणाचे हे वचन ऐकल्यावर परशुराम आपला 'परशु' गोकर्णपासून दक्षिणेकडे भिरकावतो व तो 'परशु' कन्याकुमारीपर्यंत जाऊन पडतो व त्यातूनच आजची कर्नाटक, केरळ ही राज्ये व तमीळनाडूतील कन्याकुमारीचा प्रदेश निर्माण झाला अशी कथा सांगितली जाते. अशा तऱ्हेने गोकर्णपासून कन्याकुमारीपर्यंत निर्माण झालेली भूमी परशुराम ब्राह्मणांना दान करतो व ह्या पट्ट्यात समुद्रकिनारपट्टीच्या कडेने ब्राह्मणांची एकंदरीत चौसष्ट (६४) गावे वसवतो अशी ह्या भागातील हिंदूंमध्ये श्रद्धा आहे. यापैकी बत्तीस (३२) म्हणजे अर्धी गावे तुळू भाषा बोलली जाणाऱ्या प्रदेशात म्हणजेच गोकर्ण ते पेरुमपुझा ह्या पट्ट्यात आहेत, तर उर्वरित बत्तीस (३२) गावे पेरुमपुझा ते कन्याकुमारी ह्या पट्ट्यात आहेत. केरळमधील ह्या बत्तीस गावांची नावे पुढीलप्रमाणे असल्याची आपणास काही स्रोत्रांतून माहिती मिळते – पय्यन्नूर, पेरुमचेल्लूर, अलथ्थीयूर, करनथोल, चोकीरम् (शूकापूरम), पान्नीयुर, कारीक्काऊ, इस्सानमंगलम्, थ्रूसीवपेरुर, पेरुवनम्, चामुंडा (चेम्मन्ता), इरुनगाटीक्कूटल (इरुन्गालूक्कूड), अक्तीपूथूर (अवित्ताथूर), पारावूर, ऐरानीक्कूलम, चेनगानाद् (चेनगामानाडू), इलीभ्यम, उलीयान्नूर, कालूतानातू, येत्तूमानूर, कुमारनाल्लूर, तुडापूरी, अरनमूळ, तिरुवळ्ळ, किंडांगूर, चेनगान्नूर, कावीयूर, वेनमानी आणि निर्मण्ण (निरानम). परशुरामाने ही गावे निर्माण केल्यावर केरळच्या लोकांच्या भल्यासाठी वा खुशालीसाठी व त्यांची समृद्धी व्हावी यासाठी एकूण एकशे आठ (१०८) शिवमंदिरे व एकशे आठ (१०८) दुर्गामातेची मंदिरे गोकर्णपासून संपूर्ण केरळ ते कन्याकुमारीपर्यंत निर्माण केली अशीही ह्या भागात

जर चांगली माणसे हुशार होतील आणि हुशार माणसे चांगली होतील,
तर जग किती चांगले होईल! – एलिझाबेथ वईसव

मान्यता आहे. ह्या २१६ मंदिरापैकी सर्वात उत्तरेकडील गोकर्ण हे शिवमंदिर होय. तर सर्वात दक्षिणेकडचे कन्याकुमारीचे मंदिर होय.

आपण पूर्व भारताचा विचार केल्यावर आपल्या लक्षात येते की, भारताच्या पूर्व समुद्र किनारपट्टीवरील (बंगालचा उपसागर) असलेले ओरिसा (सध्या हे राज्य ओडीशा या नावाने ओळखले जाते) हे राज्य तेथील विविध मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. येथील कोणार्कचे सूर्यमंदिर व पुरीचे जगन्नाथ (भगवान विष्णू) मंदिर ही दोन मंदिरे तर जगप्रसिद्ध आहेतच. परंतु या दोन मंदिरांसोबतच ओरिसात इतर अनेक मंदिरे आहेत व ही मंदिरे फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर प्रसिद्ध आहेत. ओरिसामध्ये देखील भारतातील इतर प्रदेश वा राज्यांप्रमाणे मोठ्या प्रमाणात शिवमंदिरे आहेत. अशाच एका शिवमंदिरांपैकी भुवनेश्वरचे लिंगराज मंदिर होय. हे मंदिर ओडिशा राज्याची राजधानी भुवनेश्वर येथे आहे. भुवनेश्वर हे ओडिशातील सर्वात मोठे शहर असून हे शहर ओडिशात व भारतात मंदिरांचे शहर म्हणून (City of temples) ओळखले जाते. याचे कारण येथे अनेक मंदिरे आहेत. अशाच एका मंदिरांपैकी लिंगराज मंदिर एक होय. अभ्यासकांचे असे मत आहे की, मूलतः हे शिवमंदिर असले तरी गंग राजवंशाच्या काळात (इसवी सन ११ वे ते १५ वे शतक) ओडिशात वैष्णव पंथाचा प्रभाव वाढण्यास सुरुवात झाल्यामुळे येथे भगवान शिव व भगवान विष्णू ह्या दोहोंची पूजा केली जाते. त्यामुळे येथे 'हरिहराची' म्हणजेच भगवान विष्णू व भगवान शिव या दोहोंचीही पूजा होते. येथे वाचकांना सांगावेसे वाटते की, 'हरी' म्हणजे विष्णू तर 'हर' म्हणजे शिव होय. येथील मूळ शिवलिंग एका आंब्याच्या झाडाखाली होते अशी मान्यता असल्यामुळे ह्या ठिकाणाला 'एकाम्ब्र' असे देखील म्हटले जाते. येथील शिवलिंग हे स्वयंभू शिवलिंग असल्याचे मानले जाते. लिंगराज मंदिर हे कलिंग स्थापत्य शैलीत बांधलेले अतिशय सुंदर मंदिर असून फर्ग्युसन ह्या प्रसिद्ध इतिहासकाराने ह्या मंदिराचा उल्लेख व गौरव 'पूर्णतः हिंदू शैलीत बांधलेले मंदिर' अशा शब्दांत केला आहे. अभ्यासकांचा असा कयास आहे की, ह्या मंदिराचे निर्माण सोमवंशी राजघराण्याच्या काळात (इसवीसन ९ वे शतक ते इसवीसन १२ वे शतक) झाले असावे व नंतरच्या काळात गंग राजवंशातील (इसवीसन ११ वे शतक ते साधारणतः इसवीसन १५ वे शतक) राजांनी त्यात येथील बांधकामात काही प्रमाणात भर घातली असावी वा जीर्णोद्धार केला असावा. आपण अगोदर उल्लेख केलेलाच आहे की, लिंगराज मंदिर हे कलिंग स्थापत्यशैलीत बांधलेले असून ह्या शैलीचा उल्लेख तज्ज्ञांनी 'देऊळ' असा केला आहे. ह्या देऊळ शैलीत एकंदरीत संपूर्ण मंदिराची विभागणी विमान (मुख्य गाभारा), जगमोहन, नटमंदिर व शेगमंडव अशा चार भागांमध्ये होतो. कलिंग स्थापत्य शैलीतील मंदिरे प्रामुख्याने ओडिशात आढळतात. त्याचप्रमाणे ह्या शैलीतील मंदिरे पश्चिम बंगाल तसेच आंध्रप्रदेशच्या काही भागांमध्ये देखील आढळतात. लिंगराज मंदिराच्या मुख्य कळसावर (गोपुरावर) हत्ती, गरुड व सिंहाचे शरीर असलेल्या दैवी प्राण्याचे (याली) शिल्प कोरलेले देखील आढळते. लिंगराज मंदिर पूर्वमुखी असून हे मंदिर वालुकाश्म खडक तसेच जांभा प्रकारच्या खडकापासून बांधलेले आहे. लिंगराज मंदिराशेजारीच बिंदुसागर नामक तलाव असून लिंगराज मंदिरातूनच गुप्त रुपाने निघालेली नदी बिंदुसागर तलावाला पाणी पुरवठा करते अशी भाविकांमध्ये श्रद्धा आहे. येथे येणारे भाविक ह्या तलावात स्नान करत असतात. लिंगराज मंदिरात साजरा केला जाणारा अतिशय महत्त्वाचा सण म्हणजे अर्थात 'महाशिवरात्री' हा सण होय. हजारो भाविक श्रावण महिन्यात कावडीने पवित्र महानदीचे पाणी घेऊन लिंगराज मंदिरात अभिषेक करण्यासाठी जात असतात. आपणास हिंदू धर्मग्रंथांमधून अशी माहिती मिळते की, समुद्र मंथन श्रावण महिन्यातच झाले होते.

सबंध सूर्य झाकळून टाकायला एकच ढग पुरेसा असतो. – थॉमस फुल

भुवनेश्वर या शहराचे नाव भगवान शिवाच्या संस्कृत मधील त्रिभुवनेश्वर (तिन्ही जगांचा स्वामी) या नावावरून पडलेले असल्याची भक्तांमध्ये श्रद्धा आहे. भुवनेश्वर हे ओडिशातील भगवान शिवाचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. कारण येथे लिंगराज मंदिराप्रमाणेच भगवान शिवाची इतर अनेक मंदिरे आहेत. तसेच अभ्यासकांचे मत आहे की, येथील बरीचशी मंदिरे इसवीसन ८ वे ते इसवीसन १२ वे शतक ह्या कालावधीत बांधलेली असावीत. लिंगराज मंदिराप्रमाणेच भुवनेश्वरमधील मुक्तेश्वर व ब्रह्मेश्वर ही प्रसिद्ध शिवमंदिरे होत. ही मंदिरेदेखील हजार ते अकराशे वर्षे जुनी वा पुरातन असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. 'मुक्तेश्वर' ह्या शब्दाचा अर्थ 'मुक्ती देणारा देव' अर्थात भगवान शिव असा होतो. तर 'ब्रह्मेश्वर' हे भगवान शिवाचेच एक रूप वा स्वरूप असल्याचे भाविक मानतात.

दक्षिण भारतातील तमीळनाडू ह्या राज्यामधील कांचीपुरम् हे देखील भारतातील व प्रामुख्याने दक्षिण भारतातील (तमीळनाडूतील) मंदिरांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या शहराचे वैशिष्ट्य असे की, हे शहर (अर्थात, कांचीपुरम् नावाचा जिल्हा असून ह्या जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणाचे नाव देखील कांचीपुरम्च आहे) शैव तसेच वैष्णव ह्या दोन्ही पंथियांसाठी महत्त्वाचे आहे. कांचीपुरम् येथील सर्वात प्रसिद्ध असे शिवमंदिर म्हणजे 'कांची कैलासनाथ मंदिर' हे होय. हे दक्षिण भारतातील मंदिर असल्यामुळे अर्थात ते द्रविड स्थापत्यकलेत वा शैलीत बांधलेले असून ह्या मंदिराचे निर्माण पल्लव राजघराण्यातील राजा राजसिम्ह (दुसरा नरसिंहवर्मन) याने इसवीसन ६८५ ते ७०५ या कालावधीत केले असावे असे अभ्यासकांचे मत आहे. ह्या मंदिराचे स्थापत्यशास्त्र अतिशय सुंदर असून येथील मंदिराच्या भिंतींवर व स्तंभांवर अनेक हिंदू-देव-देवतांची व दैवीशक्तींची शिल्पे कोरलेली आढळतात. ह्या मंदिरात महाशिवरात्रीचा सण फार मोठ्या प्रमाणात व उत्साहाने साजरा केला जातो. कांचीपुरम् येथील एकाम्ब्रेश्वर, कर्चपेश्वरार मंदिर (ह्या मंदिराविषयी अशी कथा सांगितली जाते की, येथे साक्षात भगवान विष्णूने कूर्मरुपात भगवान शिवाची आराधना केली होती), कामाक्षी मंदिर (माता पार्वतीचे दक्षिणेतील एक नाव कामाक्षी हे होय) कुमारकोट्टम मंदिर (मुरुगन म्हणजेच कुमार कार्तिकेयाचे मंदिर) ही काही इतर प्रसिद्ध मंदिरे होत. प्राचीन काळात प्रामुख्याने तमीळनाडूच्या बऱ्याच भागावर राज्य करणाऱ्या पल्लव राजघराण्याची (इसवीसन सुमारे २७५ ते इसवीसन सुमारे ८९७ हा कालावधी) राजधानी कांचीपुरम् येथे होती असे अभ्यासकांचे मत आहे. आदी शंकराचार्यांनी भारताच्या ज्या चार भागांत अर्थात, दक्षिण, पश्चिम, पूर्व व उत्तर भागात चार पीठांची वा मठांची स्थापना केली त्यापैकी एक कांचीपीठ (मठ) होय. इतर तीन पीठे वा मठ द्वारका (पश्चिम), पुरी (पूर्व) व बदरीनाथ (उत्तर) ही होत. काही अभ्यासकांचे मत आहे की, आदी शंकराचार्यांनी स्थापन केलेले दक्षिणेकडील पीठ कर्नाटकमधील चिकमंगळूर जिल्ह्यातील श्रींगेरी ह्या ठिकाणी आहे. आदी शंकराचार्यांनी आपल्या आयुष्याचा शेवटचा काळ कांचीपुरम् येथे व्यतीत केला होता असे मानले जाते.

तमीळनाडूतील तंजावर जिल्ह्यातील 'कुम्बकोनम्' हे ठिकाण देखील मंदिरांसाठी फार प्रसिद्ध आहे. कुम्बकोनम्ला दक्षिणेतील मंदिरांचे शहर असे म्हटले जाते. 'कुम्बकोनम्' ह्या शब्दाचा अर्थ साधारणतः कुंभांचा (कुम्भाचा) कोन असा होतो. ह्या नावाच्या व्युत्पत्तीची पुढीलप्रमाणे कथा सांगितली जाते- ब्रह्मदेवाच्या हातातील कुंभामध्ये सृष्टी निर्माण करण्यासाठीच्या आवश्यक गोष्टी व शक्ती असते; एकदा भगवान शिव पृथ्वीवरील पाप वाढल्यावर सृष्टी नष्ट करण्यासाठी प्रलय आणतात. तेव्हा संपूर्ण सृष्टी नष्ट होते व त्या प्रक्रियेत ब्रह्मदेवाच्या हातातील सृष्टी निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेला कुंभ हातातून निसटतो व तो कुंभ

सध्याचे 'कुम्बकोनम्' हे जे ठिकाण आहे तेथे प्रकट होतो. अशातऱ्हेने ब्रह्मदेवाच्या हातातील कुंभ येथे पडल्यामुळे ह्या ठिकाणाचे नाव कुम्बकोनम् पडले असे येथील लोक मानतात. आपण अगोदर म्हटल्याप्रमाणे कुम्बकोनम् हे मंदिरांचे शहर म्हणून ओळखले जाते. येथील मंदिरांची संख्या जवळ जवळ १८० पेक्षा जास्त असून लहान-मोठी मंदिरे धरून ही संख्या तर हजारापेक्षा जास्त असल्याचे अभ्यासक म्हणतात. येथील प्रमुख शिवमंदिर आदी कुंम्बेश्वरार मंदिर या नावाने प्रसिद्ध आहे. ह्या ठिकाणी भगवान शिवाची पूजा शिवलिंगाच्या स्वरूपात केली जाते. येथे माता पार्वती 'मंगलम्बिगाई अम्मा' ह्या नावाने ओळखली जाते. येथील मंदिराला चार गोपुरे असल्याची माहिती आपणास मिळते. येथे आदी कुम्बेश्वरार सोबतच इतरही देव-देवतांची देवळे आहेत. येथील मंदिराचे निर्माण चोल राजांच्या काळात इसवीसनाच्या ९ व्या शतकात झाले असावे व इसवीसनाच्या १६ व्या शतकात तंजावरच्या नायक शासकांनी (हे तंजावरचे नायक मूलतः विजयनगरच्या राजांचे प्रांतीय अधिकारी होते) ह्या मंदिराचा वा मंदिर समूहाचा विस्तार केला असावा असे इतिहासकारांचे मत आहे. प्रलयाच्या वेळी ब्रह्मदेवाच्या कुंभातील अमृत कुम्बकोनम् येथे सांडल्याचे भक्तगण मानतात. हे अमृत येथे सांडले तेथे महामहम् तलाव निर्माण झाले असल्याची कथा सांगितली जाते. भारतभरातील भाविक महामहम् तीर्थावर येत असतात. येथे प्राचीन काळात सुवर्णतुला करून ते सोने गरजवंतांमध्ये वा ब्राह्मणांमध्ये दान करण्याची प्रथा होती अशा स्वरूपाची माहिती आपणास मिळते. प्रलयात जेव्हा ब्रह्मदेवाच्या हातातील अमृताचा कुंभ निसटतो तेव्हा भगवान शिव म्हणतात की, 'हा अमृताचा कुंभ पृथ्वीवरील अतिशय पवित्र ठिकाणी प्रकट होईल.' त्यानुसार हा कुंभ कुम्बकोनमला प्रकट होतो अशी कथा सांगितली जाते. ब्रह्मदेवाचा कुंभ कुम्बकोनम्ला प्रकट झाल्यावर भगवान शिव बाणाने त्या कुंभाचा छेद घेतात व त्या कुंभाचे तुकडे आसपास ज्या ज्या ठिकाणी विखुरले तेथे कुंभेश्वर, सोमेश्वर, काशी विश्वनाथ, नागेश्वर, सारंगपाणी, चक्रपाणी, वर्धराज इत्यादी मंदिरांचे निर्माण झाले अशीही कथा ऐकावयास मिळते. 'महामहम्' तीर्थावर भाविकांना येण्याची अनुमती द्यावी अशी ब्रह्मदेवाने भगवान शिवाला विनंती केल्यावर भगवान शिव भगवान विष्णुसह ह्या तीर्थाच्या मध्यात प्रकट झाले अशी भक्तांमध्ये मान्यता आहे. महामहम् तीर्थावर दर बारा वर्षांनी दक्षिणेतील कुंभमेळा भरत असतो. (क्रमशः)

**संदर्भ :**


- इंडिया - अ सेक्रेड जॉग्रफी (इंग्रजी): डायना एल. येक. (इंग्रजी) सुधारीत आवृत्ती
- गॅझेअिअर ऑफ इंडिया - महाराष्ट्र स्टेट, ठाणे डिस्ट्रीक्ट
- भारतीय संस्कृती कोश - खंड ९ - संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक - तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर
- भक्तिकोश तृतीय खंड - भारतीय संप्रदाय विद्यावायस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर
- शिवलिंग (इंग्रजी) : एन्. के. सिंग
- सेव्हन सिक्रेटस् ऑफ शिवा : देवदत्त पट्टनायक
- शिवा टू शंकर : देवदत्त पट्टनायक
- विश्वकोश-खंड १७ : प्रमुख संपादक : विजया वाड
- असे घडले ठाणे - डॉ. दाऊद दळवी
- देवदर्शन जिल्हा ठाणे : मोरेश्वर के. कुंटे व सौ. विजया कुंटे



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com


•••

# चोंगचिंग दौरा

*सौ. ए. के. जोशी इ. मि. शाळेने चोंगचिंग, चिन येथे झालेल्या CASTIC ह्या स्पर्धेबरोबर Belt and Road summer camp for teenagers आणि Science Forum for teachers, ह्या दोन कार्यक्रमांतही सहभाग घेतला होता. याचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे- संपादक*

दर वर्षीप्रमाणे ह्या वर्षीसुद्धा आमच्या शाळेने (सौ. ए. के. जोशी इ. मि. स्कूल) CASTIC ह्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. ह्या स्पर्धे बरोबर Belt and Road summer camp for teenagers आणि Science Forum for teachers, हे दोन कार्यक्रम होते. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बेडेकर, डॉ. आगरकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली CASTIC चे चार विद्यार्थी, Belt and Road चे चार विद्यार्थी, माजी सहकारी शिक्षिका सौ. गौरी मोहिले व मी चीनला जाण्यासाठी निघालो. ह्या सहभागासाठी आमच्या शाळेच्या डीन- सौ. कालिंदी कोल्हटकर व इतर सर्वांचा पाठिंबा होता.

१४ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट ह्या दिवसात वर सांगितलेल्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन चोंगचिंग येथे केले होते. चोंगचिंग हे २ वर्षांपूर्वीपर्यंत सीचुआन प्रांतात होते. २ वर्षांपूर्वी चोंगचिंग मुनिसिपाल्टीची स्थापना झाली व ते सीचुआनपासून वेगळे झाले. हे शहर छोट्या-छोट्या टेकड्यांवर वसलेले आहे. सुरेख रस्ते, उड्डाणपुलांचे जाळे, रस्त्याच्या दुतर्फा असलेले फुलांचे ताटवे, अनेक प्रकारची झाडे, उंच-उंच बऱ्याचशा एकसारख्या दिसणाऱ्या इमारती ह्यामुळे प्रथमदर्शनीच ह्या आखीव-रेखीव शहराने मनावर छाप पाडली. ह्या शहराचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, इथे एकही सायकल नाही. (गाईडने सांगितले व आम्हाला एकही सायकलस्वार दिसला नाही.)

CASTIC, Summer Camp for Teenager आणि Science Forum हे तीनही एकाच वेळी सुरू होते; पण सर्वांचे नियोजन इतके काटेकोरपणे केले होते की, कुठेच गडबड-गोंधळ नव्हता. प्रत्येक टीमबरोबर त्यांचे दुभाषे होते. अतिशय कष्टाळू, मदतीला तत्पर व हसतमुख. त्यांना कधी काय करायचे आहे ते नक्की माहीत होते. १७-१८ वर्षांच्या असलेल्या ह्या मुली व मुले परदेशी पाहुण्यांची जबाबदारी हसतमुखाने घेताना बघून त्यांचे कौतुक वाटले.

CASTIC चा उद्घाटन सोहळा अतिशय दिमाखदार झाला. चीन मधील विज्ञान व तंत्रज्ञानसाठी असलेल्या विविध विभागांचे मंत्री व अधिकारी ह्यांची थोडक्यात भाषणे झाली. आम्हाला 'भाषांतर यंत्र' दिले होते. एका कानावर पडणारे चिनी भाषण व दुसऱ्या कानावर पडणारे इंग्रजी भाषांतर ऐकणे हा एक वेगळाच अनुभव होता. तीन ते चार प्रकारची नृत्ये बघायला मिळाली. अतिशय सुंदर लयबद्ध हालचाली आणि एकमेकांशी असलेला समन्वय ह्यामुळे ही नृत्ये लक्षात राहिली. कौतुकाची गोष्ट अशी की, नृत्यासाठी लागणारी साधने मुले स्वतः घेऊन येत होती व नृत्य झाल्यावर घेऊन जात होती. उद्घाटन सोहळ्याचे बीज-भाषण एका अतिशय तरुण चिनी प्रोफेसरने केले. त्यांनी Purdue University मध्ये Algebraic Geometry ह्या विषयावर अभ्यास केला आहे. हा विषय त्यांनी विविध समीकरणे घेऊन व ती वापरून आलेल्या भौमितिक आकृत्या दाखवून स्पष्ट केला. १३-१८ वयोगटातील मुलांना अशा तरुण शास्त्रज्ञाचे भाषण ऐकायला मिळणे हे खरंच त्यांचे भाग्य आहे.

Belt and Road मध्ये भाग घेतलेल्या मुलांना आपआपल्या देशाचे वैशिष्ट्य दाखविणारा कार्यक्रम

टीकाकार म्हणजे कीर्तीच्या वाटेवरचे गळेकापू दरोडेखोरच - रॉबर्ट बर्नर्स

करायचा होता. रंगीबेरंगी पोशाखातील विद्यार्थ्यांनी विविध देशातील संस्कृतीचे दर्शन घडविले. आमच्या विद्यार्थ्यांनी पावसाळ्याचे वर्णन करणारे संस्कृत गाणे सादर केले. गाण्याचा अर्थ कळत नसतानाही अनेकांनी ठेका धरलेला बघून आमच्या संगीत शिक्षिका वीणा जोशी ह्यांच्या बद्दल कौतुक वाटले. त्या दिवशी एकत्र जेवणाचा कार्यक्रम होता. त्यावेळी अनेक देशातील मुले व शिक्षक यांची ओळख झाली, संस्कृती बद्दल थोडी माहिती मिळाली.






शिक्षकांसाठी असलेल्या Science Forum मध्ये १६ ऑगस्ट ह्या दिवशी विविध देशांतील शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या वक्त्यांची भाषणे ऐकायला मिळाली. चीन, अमेरिका, फिनलॉंड ह्या देशांतील वक्त्यांनी आपले मुद्दे सादरीकरण करून मांडले, त्यापैकी दोन मुद्दे मला अतिशय महत्त्वाचे वाटले १) विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, इंजिनिअरींग व इकोलॉजी हे विषय एकत्रितपणे शिकविले पाहिजेत (integrated approach) २) प्रशिक्षण हे फक्त शिक्षकांचे नाही तर शिक्षण क्षेत्रात जे Policy makers आहेत त्यांचेही करावयास पाहिजे. १७ ऑगस्ट ह्या दिवशी पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, चीन, इंडोनिशिया व टूनेशिया येथील वक्त्यांनी आपआपल्या देशातील विज्ञान शिक्षण ह्या विषयावर सादरीकरण केली.

Silk route navigation ह्या विषयावर आमची एक कार्यशाळा झाली. त्यामधे बोटीची माहिती (आकार, वस्तुमान, त्यावर कार्य करणारे बल इत्यादी) देण्यात आली. मग आम्हाला एक बोट बनवायला सांगितली. ४-५ जणांचा एक गट. आम्ही दोघी व दोन इंडोनेशियन शिक्षक असा गट झाला. कागद, रिकाम्या बाटल्या, स्ट्रॉ, दोरे इत्यादी वस्तू घेऊन बोट बनवायची होती. आमच्या गटाने सर्वात साधी व सर्वांच्या आधी बोट बनविली. दिलेले तीन निकष लावून जेव्हा आमची बोट श्रेष्ठ ठरली तेव्हा खूप आनंद झाला.






Belt and Road च्या विद्यार्थ्यांचे विविध देशांतील मुलांबरोबर गट करण्यात आले होते. त्यांनी आधीच जो विषय निवडला होता त्यावर आधारित प्रकल्प त्यांना बनवायचा होता. हे सर्व काम Changgin Secondary School

---

जगात जे जे काही उत्कृष्ट बोलले गेले किंवा लिहिले गेले, ते जाणणे म्हणजे संस्कृती. - मॅथ्यू अर्नाल्ड

No. 8 मध्ये करायचे होते. शाळा सरकारी होती पण तिथे असलेल्या सुविधा बघून विद्यार्थी अचंबित झाले. सकाळी मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. दुपारी 3D Printing च्या मदतीने त्यांना प्रकल्प बनवायचा होता व संध्याकाळी त्याबद्दलचे सादरीकरण तयार करायचे होते. तो संपूर्ण दिवस मुलांनी शाळेत आपल्या विदेशी मित्र-मैत्रीणी सोबत काम करण्यात घालवला. 3D Printing हे नवीन तंत्रज्ञान मुलांना शिकायला मिळाले.




CASTIC मध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प व्यवस्थित सादर केले. विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या विषयाच्या प्रदर्शनाला इतकी गर्दी होऊ शकते ह्याचे त्यांना आश्चर्य वाटले. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत प्रकल्पाची माहिती देऊन मुले दमून गेली. ह्या कामात त्यांची दुभाष्याने खूप मदत केली. CASTIC मध्ये सहभागी झालेल्या दोन्ही प्रकल्पांना कास्य पदके मिळाली.



ह्या सर्व कार्यक्रमांबरोबर आम्ही दोन-तीन छोट्या सहली सुद्धा केल्या. चिकिकू (Ciquikou) ही एक




बाजारपेठ व Honguang Guild ही ठिकाणे बघून पुण्याच्या तुळशीबागेची व जुन्या वाड्यांची आठवण झाली. 3 Gorges Museum दाखवायला नेले होते. 3 Gorges हे धरण जेव्हा बांधले तेव्हा त्या परिसरात असलेले प्राणी, पक्षी, वनस्पती, विविध प्रकारचे खडक, लोकजीवन, विविध प्रकारची नाणी-नोटा, शिवणकाम व भरतकामाचे उत्कृष्ट नमुने तिथे बघायला मिळाले. Museum चार मजली आणि वेळ केवळ दीड तास त्यामुळे सर्व मजल्यांवर फक्त चक्कर मारून आलो. Museum नीट न पहाता आल्याची रुखरुख मनात राहिली.

उद्घाटन सोहळ्याप्रमाणे सांगता सोहळाही नीटनेटका झाला. पुढच्या वर्षीचे CASTIC मकाऊला होणार आहे, त्याकरिता CASTIC चा झेंडा चोंगचिंग कडून मकाऊला देण्यात आला. सर्वांनी मकाऊचे अभिनंदन केले व सोहळा संपला.

ह्या दौऱ्यात काही वैशिष्ट्ये जाणवली. प्रत्येक गोष्टीचे केलेले काटेकोर नियोजन, प्रत्येकजण पाळत असलेली शिस्त, दाखविलेले आदरातिथ्य, चीनची कष्टाळू व हसतमुख तरुण पिढी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विज्ञान व तंत्रज्ञान ह्या विषयाला शालेय स्तरापासून विद्यापीठापर्यंत दिलेले महत्त्व. अशा अनेक अनुभव व आठवणीची शिदोरी चोंगचिंग दौऱ्याने दिली.

**- पूर्णिमा विनायक साठे**
सौ. ए. के. जोशी इ. मि. स्कूल,
ठाणे

ज्याला कन्या जिंकायची आहे, त्याने मातेपासून सुरुवात करावी. - जॉन रे

# माध्यमाच्या गोंधळातील शांतता लोकशाहीसाठी घातक

*देशातील माध्यमं किती स्वतंत्र व निष्पक्ष आहेत याचे विश्लेषण या लेखात केले आहे- संपादक*

कोणत्याही देशाच्या लोकशाहीचा गाभा हा किती बळकट आहे हे सिद्ध करण्यासाठी त्या देशातील माध्यमं किती स्वतंत्र व निष्पक्ष आहेत याचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. लोकशाहीच्या विकासासाठी व बळकटीसाठी संविधानाने लिखित स्वरूपात तीन संस्थांचा उल्लेख करून त्यांची कार्ये, अधिकार व मर्यादा स्पष्ट केल्यामुळे या संस्थांना आपसूकच लोककल्याणाच्या, लोकहिताच्या बाहेर जाऊन कोणतेही कार्य करता येत नाही आणि तसा संभ्रम निर्माण करता येत नाही. या संस्था म्हणजे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ. या तीनही संस्था संविधानाच्या व कायद्याच्या अधीन राहून कार्य करतात व म्हणून त्या जबाबदार संस्था आहेत असे म्हणण्यास काही हरकत नसावी. पण लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून लौकिक असलेले माध्यम ज्याचा उल्लेख संविधानामध्ये लोकशाहीचा चौथा स्तंभ किंवा संस्था म्हणून उल्लेख नाही असा कुणाप्रती जबाबदार आहे? काय कोणतीही जबाबदार संस्था, जशी माध्यमे ही कायद्याची किंवा लोक कल्याणाची, लोकहिताची तमा न बाळगता स्वतःचे कार्य करू शकते का?

इंग्रजांशी लढण्यासाठी लोकजागृतीची आवश्यकता होती म्हणून अनेकांनी स्वतःचा संसार वाऱ्यावर सोडून, जे काही आहे ते विकून, त्यातून वृत्तपत्रं काढली व त्या माध्यमातून लोकांना जागृत करण्याचे काम केले. यामध्ये महाराष्ट्र व बंगाल राज्य अग्रेसर होते. ज्या कुणी लोकांनी वृत्तपत्र चालवली त्यांनी यातून संपत्ती कमावली असे अजून तरी वाचनात आले नाही. मुळात खरे तर संपत्ती कमविणे किंवा वृत्तपत्राच्या माध्यमातून स्वतःचा संसार थाटण्यासाठी कुणी वृत्तपत्र सुरू केलीच नव्हती आणि म्हणून त्यांच्या लेखणीने फक्त देशप्रेमच जागे केले नाही तर समाजाला एक शिकवण देण्याचे कामही केले. विषयांतर होईल म्हणून त्या सर्व वृत्तपत्र चळवळीत आयुष्य झोकून देणाऱ्या लोकांचे नाव टाळत आहे. मुळात माध्यमाचे काम हे समाजाला एकसंध ठेवणे व सत्ता-पक्षाच्या विरोधात उभे राहणे असले पाहिजे, तसे ते आहेच. शासन कुणाचे आहे हे माध्यमासाठी गौण असणे हे स्वतंत्र माध्यमाचे लक्षण आहे असे म्हणता येईल. हेच काम इंग्रजांविरुद्ध त्या काळातील वृत्तपत्रांनी केले. परंतु आज वृत्तपत्र असो किंवा इलेक्ट्रॉनिक क्रांतीमुळे जन्माला आलेल्या वृत्तवाहिन्या असो अथवा सामाजिक माध्यमे; जसे व्हाट्सअप किंवा फेसबुक किंवा ट्विटर या सर्वांनीच लोकशाही धोक्यात आणल्याचे चित्र आहे.

सामाजिक माध्यमांना एक वेळ बाजूला सारले तरी आज असलेले वृत्तपत्र व वृत्तवाहिन्या मुळात का निर्माण झाल्या आहेत हे समजावून घेण्यासाठी एकदा त्यांचा आर्थिक अहवाल वाचला पाहिजे. करोडोची उलाढाल असणारा हा व्यवसाय, ज्या क्षणी व्यवसाय म्हणून नोंदविला गेला त्याचक्षणी लोकशाहीचा हा चौथा स्तंभ मुळाशी काहीसा कुमकुवत होताना आढळून आला.

माध्यमे ही प्रामुख्याने दोन कारणांसाठी असली पाहिजेत. पहिले, लोक जागृती. यामध्ये समाजामध्ये ज्या काही वाईट चालीरीती,समजुती, प्रथा, विचार यावर हल्ले चढवून समाजाच्या स्वास्थ्यासाठी जे काही चांगले आहे त्याचा प्रचार करणे. यासाठी कोणत्याही

संकटाला सामोरे जाण्याची तयारी वृत्तपत्र, वृत्तवाहिनीच्या मालकाची, संपादकाची व पत्रकाराची असली पाहिजे व दुसरे म्हणजे, वृत्तपत्र व वृत्तवाहिनी नेहमीच विरोधी पक्षाच्या भूमिकेत राहून सत्ता-पक्षाला प्रश्न विचारणारी असली पाहिजे.

खरे तर माध्यमे कशी असावीत, त्यांनी काय लिहावे, काय छापावे,काय बोलावे व काय दाखवावे; तसेच काय लिहू नये, काय छापू नये,काय बोलू नये व काय दाखवू नये यावर कुठला कायदा करता येईल असे मला वाटत नाही. हे सर्व तुमच्या नैतिकतेवर, तुमच्या विचारावर, उद्देशांवर व सर्वात महत्त्वाचे तुमच्या तत्त्वावर अवलंबून असते. एकदा का तत्त्व, विचार, उद्देश बाजूला सारला की मग जे काही उरते त्यास 'स्पर्धा' म्हणावे लागते, ज्यामध्ये सर्वकाही करण्याची परवानगी असते व उद्देश फक्त अधिकाधिक जाहिराती मिळवून मालकांना खुश करणे असते. नुकतेच बिहार व उत्तरप्रदेशमध्ये लहान मुलीवर झालेल्या राक्षसी कृत्याची पत्रकारिता करताना अनेक माध्यमांनी त्या मुलीचे छायाचित्र व नावे जाहीर केली यावर सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त करून असे करण्यास मज्जाव केला. खरे तर याआधीही न्यायालयाने माध्यमांना असे करण्यापासून सावध केले होते; पण आपली पत्रकारिता अधिक मनोरंजक व आकर्षित कशी होईल यासाठी हा सगळा खटाटोप सुरू असतो. खरे तर माध्यमांनीच स्वतःची मर्यादा लक्षात घेतली पाहिजे; पण तसे होताना दिसत नाही.

मागील काही वर्षांमध्ये अनेक नवनवीन वृत्तवाहिन्या निर्माण झाल्या आहेत आणि अनेक सर्वे असे सांगतात की, सामान्य माणसेही मनोरंजनात्मक वाहिन्या पाहण्यापेक्षा वृत्तवाहिन्या पाहणे अधिक पसंद करतात. आज दिवसभर अनेक वृत्तवाहिन्या ह्या वेगवेगळ्या विषयांवर चर्चा, वादविवाद घडवून आणताना दिसत आहेत. खरे तर लोकशाहीसाठी चर्चा आणि वादविवाद होणे हे फार आवश्यक आहे. पण त्या वादाचे स्वरूप काय असले पाहिजे, विषय काय असला पाहिजे याविषयी मात्र ही माध्यमे लोकहितापेक्षा स्व-आर्थिक-हितच अधिक बघतात. आणि यामुळे ज्या चौथ्या स्तंभाच्या भरवशावर सामान्य माणसे लोकशाही बळकट होण्याची आशा धरून आहेत तिच माध्यमे हळूहळू लोकशाही कुमकुवत करताना दिसून येत असल्याचे चित्र आहे. अनेक थोरामोठ्यांचे विचार ऐकल्यास हे कळून येते की, माध्यमे आज माध्यमाचा विचार, उद्देश व तत्त्वं हरवून बसली आहेत. रोज रोज होणारे वाद, खोट्या व बनावट बातम्या, सत्ता-पक्षाशी असलेली मैत्री, वातानुकूलित स्टुडिओमध्ये बसून जाहिरातीसाठी चाललेली चर्चा हे सगळेच स्क्रिप्टेड असल्यासारखे वाटते. या वादांचे, चर्चा-स्वरूप एवढे क्लेशदायक असते की, एखादा विषय सोडविण्यापेक्षा विविध पक्षाचे प्रवक्ते, विद्वान, विचारक काहीतरी नवीन वाद निर्माण करून जातात. या वृत्तवाहिन्यांच्या गोंधळामध्ये एक गंभीर शांतता ज्याला जाणवेल त्यास यामुळे लोकशाहीस असलेला धोकाही समजून येईल.

माध्यमे ही लोकांच्या समस्या मांडणारी असावीत, लोकांमध्ये समस्या व गोंधळ, वैर निर्माण करणारी नसावीत. दुर्दैवाने आजची माध्यमे ही लोकशाहीसाठी पुरक नाहीत असे आजतरी चित्र आहे. अर्थात काही वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या ज्या प्रामाणिकपणे व तत्त्वाला धरून काम करत असतील त्यांना सलामच आहे. येणाऱ्या काळात माध्यमांचे वागणे हे कायद्याने निर्धारित केल्याशिवाय, समपदक, पत्रकार व मालक यांचे दायित्व कायद्याने ठरविल्याशिवाय माध्यमांना लोकशाहीच्या हितासाठी नियंत्रित करणे शक्य होणार नाही. अर्थात हे करत असताना या माध्यमांच्या सकारात्मक स्वातंत्र्याला काही बाधा पोहोचणार नाही याचीही काळजी घेणे लोकशाहीच्या बळकटीसाठी तेवढेच महत्त्वाचे आहे.

**- प्रा. विनोद वाघ**
व्हिपीएम्स टीएमसी विधी महाविद्यालय, ठाणे

# राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७

*'राष्ट्रीय आरोग्य धोरण' या उपक्रमाविषयाची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

पंचवार्षिक योजनांमध्ये आरोग्यक्षेत्राची दिशा व दृष्टिकोन ठरविण्याचे काम राष्ट्रीय आरोग्य धोरण १९८३ व २००२ ने केले. त्यानंतरच्या १४ वर्षात, आरोग्यक्षेत्राच्या संदर्भात ४ मोठे बदल दिसू लागले. या बदलांना प्रतिसाद देणाऱ्या नव्या आरोग्य धोरणाची गरज होती.

- आरोग्याचे प्राधान्यक्रम बदलत आहेत. असंसर्गजन्य तसेच जंतुसंसर्गामुळे उद्भवणाऱ्या काही रोगांचा भार वाढत चालला आहे.
- दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे आरोग्यसेवा क्षेत्राची जोमदारपणे, २ अंकी गतीने, होत असलेली वाढ.
- तिसरा बदल म्हणजे आरोग्यसेवेसाठी येणारा प्रचंड खर्च. दारिद्र्यामागचे एक मोठे कारण.
- चौथा बदल म्हणजे आर्थिक भरभराट होत असताना आर्थिक कुवतही वाढते आहे.

लक्ष्य, तत्त्व व उद्दिष्ट- सर्व वयोगटांसाठी आरोग्याची संभाव्य सर्वोत्तम पातळी व चांगले जीवनमान.

आरोग्यसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे, दर्जात सुधार व कमी खर्चात ती पुरवून हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय आरोग्य धोरणाची महत्त्वाची तत्त्वे- स्वतःशीच बांधिलकी, सर्वोत्तम दर्जाची व्यावसायिक माणसे जपणे, विश्वसनीय, पारदर्शी व जबाबदार नियामक वातावरणाचे पाठबळ, समानता, गरीबांसाठी जास्त गुंतवणूक व आर्थिक सुरक्षा, परवडण्यायोग्य खर्च, सार्वत्रिकता म्हणजे संपूर्ण लोकसंख्येची गरज भागविण्याच्या दृष्टीने आरोग्यसेवेचे व व्यवस्थेचे आरेखन.

सर्वसमावेशी भागीदारी-मल्टिस्टेकहोल्डर दृष्टीकोन व आरोग्यसेवेशी निगडित नसणाऱ्या मंत्रालयांचाही सहभाग. तसेच शैक्षणिक संस्था, बिगर सरकारी संस्था व आरोग्यसेवा उद्योगासोबत भागीदारी.

अनेकतत्त्ववाद-(प्लुरॅलिझम )-स्थानिक व समुदायांमध्ये प्रचलित, दस्तावेजीकृत, पुष्टीप्राप्तीकृत (व्हॅलिडेटेड) पद्धतींवर आधारित काम करणाऱ्या आयुष सेवा पुरवठादारांपर्यंत पोहोचणे व त्यांनाही समावेष्ट करून घेणे.

विकेंद्रीकरण-व्यावहारिक मर्यादा व संस्थात्मक कुवत अनुलक्षून एका ठरावीक पातळीपर्यंत निर्णय घेण्याचे विकेंद्रीकरण.

अनुकूलन- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञानसंपादन व उपयोजन.

आरोग्यस्थिती व आरोग्यकार्यक्रमाचा प्रभाव याबाबतीत धोरणात खालील उल्लेख आहेत.

२०२५ पर्यंत, अर्भके जिवंत जन्माला येण्याची संभाव्यता ६७.५ पासून ७० पर्यंत वाढविणे, ५ वर्षांखालील बालकांचा मृत्यूदर २३ पर्यंत घटविणे. मृतावस्थेत जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण २०१९ पर्यंत एकल अंकावर आणणे, इ.

एड्सचे जागतिक लक्ष्य ९० ९० ९० गाठणे म्हणजे बाधित ९० टक्के व्यक्तींना त्यांच्या स्थितीचे ज्ञान, त्यापैकी ९० टक्के व्यक्तींना सातत्याने ॲन्टिरिट्रोव्हायरल थेरपी व ती मिळालेल्या ९० टक्के व्यक्तींचे व्हायरल सप्रेशन.

जीवनातील खरा प्रश्न म्हणजे आपण काय करतो; काय मिळवितो हा नव्हे. - कार्लाइल

२०१८ पर्यंत महारोगाचे, २०१७ पर्यंत काळ्या आजाराचे, २०२५ पर्यंत क्षयरोगाचे उच्चाटन इ.

अंधत्वाचे प्रमाण दर हजारी ०.२५ आणणे, हृदयविकार, कर्करोग, मधुमेह व जुनाट श्वसनरोगांमुळे घडून येणाऱ्या अपमृत्यूंचे प्रमाण २५ टक्क्यांनी घटविणे.

आरोग्यसेवांची व्याप्ती वाढविणे म्हणजे सार्वजनिक आरोग्य सेवासुविधात वाढ. भृणासाठीही आरोग्यसेवा, नवजात बालकांचे लसीकरण, इ. आरोग्याशी संबंधित अशा अन्य क्षेत्रीय उद्दिष्टांचा स्वीकार आरोग्य धोरणाने केला आहे.

राष्ट्रीय आरोग्यकार्यक्रमांतर्गत माता व बालकांचे आरोग्य, पौगंडावस्थेतील मुलांसाठी शालेय आरोग्य कार्यक्रमावर भर, सूक्ष्म अन्नघटकांची कमतरता भरून काढणारा आहार विकसित करणे, लसीकरणाची व्याप्ती वाढविणे, संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (क्षय, एड्स, महारोग इ.) वाहकांद्वारे होणाऱ्या रोगांवर नियंत्रण (मलेरिया, मेंदूज्वर इ.), असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (जुनाट आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, फुफ्फुसांचे रोग, अंधत्व, बहिरेपणा रक्तक्षय, इ.) आयुषला एकात्मिक आरोग्यसेवेच्या मुख्य प्रवाहात आणणे, वृद्धांसाठी सामुदायिक केंद्रे, ऊती व अवयव प्रत्यारोपण केंद्रे, मानसिक आरोग्यासाठी तरतूद आदी बाबींचा व कृती कार्यक्रमांचा ऊहापोह केला आहे.

४० वर्षांवरील महिलांचे आरोग्य, सार्वजनिक इस्पितळे स्त्री स्नेही करणे, डजिटल टूल्सचा वापर, तसेच आपत्कालीन सेवा व आपत्ती व्यवस्थापनाची पूर्व तयारी यासाठी आरोग्य धोरणात पाठिंबा व्यक्त करण्यात आला आहे.

आयुषला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सुविधा सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध करणे, शाळा व कार्यस्थळी योगप्रसार यांचा उल्लेख आहे. आयुष औषधांचे प्रमाणीकरण व पुष्टीकरण (व्हॅलिडेशन) करणे आणि दृढ व प्रभावी गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा उभी करण्याची गरज असल्याचेही नमूद केले आहे. त्यासाठी शैक्षणिक संस्थाची उभारणी, गुणवत्ता नियंत्रणात प्रगती व संस्था आणि व्यावसायिकांच्या क्षमतेत वृद्धी याद्वारे आयुष औषधांचे संवर्धन करण्यीची गरज असल्याचेही म्हटले आहे. धोरणाचा भाग म्हणून, औषधी वनस्पतींची लागवड, आरोग्य सेवेचे पारंपरिक पूर्वज्ञान देणारे सर्टिफिकेशन, अशा व्यक्तींचा कौशल्यविकास व सहभाग त्यात राहील.

आरोग्य धोरणात शिफारस आहे की वैद्यकीय व समांतर वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा प्रदान करणाऱ्या यंत्रणेशी एकात्मिक स्वरूपाचे असावे, जेणेकरून विद्यार्थी प्रत्यक्ष वातावरणात शिकतील व वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयापुरते मर्यादित रहाणार नाही. त्या अनुषंगाने, वैद्यकीय शिक्षणाची सद्यस्थिती सुधारण्यासाठी आवश्यक कृतींचा उल्लेख आहे. देशाच्या दूरवरील अंतर्गत भागात डॉक्टर्स टिकावेत यासाठीच्या उपाययोजना, नर्सिंग शिक्षण, मध्य स्तरावरील सेवेसाठी सेतू अभ्यासक्रमांची निर्मिती, आशा कार्यक्रमाचे सर्टिफिकेशन, सुपर स्पेशालिटी समांतर वैद्यकीय कौशल्ये विकसित करण्यासाठी अभ्यासक्रमांची निर्मिती, याबद्दल सूचना, प्रस्ताव व धोरणे सांगितली आहेत. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन केडर निर्माण करण्याचाही मानस आहे.

आरोग्यसेवेसाठी आर्थिक तरतूद– दोन तृतीयांश खर्च प्राथमिक सेवेसाठी व ऊर्वरित दुय्यम व तिय्यम स्तरावरील सेवेसाठी करण्यात येईल. गरजेनुसार दुय्यम व तिय्यम स्तरावरील सेवा बिगरसरकारी क्षेत्राकडून खरीदण्यात येईल. खाजगी व बिगरसरकारी क्षेत्राकडून कंत्राटी तत्त्वावर क्षमता बांधणी, कौशल्यविकास कार्यक्रम, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीद्वारे सजगता मोहिमा, मानसिक आरोग्य कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन, इ. बाबींत सहकार्य अपेक्षित आहे. विमा व ट्रस्टद्वारे धोरणात्मक खरेदी. सेवेनुसार फी दिली जाईल. सार्वजनिक आरोग्यक्षेत्रात ज्या सेवांची उणीव आहे, उदा.निदानात्मक

कधी कधी आपल्या विचारांपेक्षा आपल्या कृती अधिक चांगल्या असतात. – पी. जे. बेले

सेवा, ॲम्ब्युलन्स, रक्तपुरवठा, पुनर्वसन, दुःखशामक सेवा, मानसिक आरोग्य, टेलिमेडिसिन, दुर्मीळ रोगांचे व्यवस्थापन, अशा सेवांसाठी खाजगी क्षेत्रासोबत भागिदारी. सहकार्य करणाऱ्या संस्था, इस्पितळे यांना सरकारी नामिकासूचीत, धोरणात्मक खरेदीत प्राधान्य देण्यात येईल. मेक इन इंडियाला बळकटी म्हणून भारतीय बनावटीची गुणवत्तापूर्ण वैद्यकीय उपकरणे सरकारी आरोग्यसेवेसाठी खरेदी करण्याचा मानस आहे. ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्यसेवा पुरविणाऱ्या व्यक्ती व संस्थांना आपल्या कौशल्यात वाढ करून देणाऱ्या संधी मिळणे गरजेचे आहे.तशी शिफारस धोरणात केलेली आहे.

नियामक चौकट- क्लिनिकल आस्थापनांचे नियमन, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण,अन्नसुरक्षा, वैद्यकीय तंत्रपद्धती व उत्पादने, क्लिनिकल चाचण्या, संशोधन व आरोग्यसंबंधित कायदे हया बाबी आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाकडे आहेत.ह्या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठी ठोस व जलद पावले उचलण्याची गरज आहे.

डॉक्टर्स, रूग्ण व समाजातील व्यक्तींना सहा व्यावसायिक परिषदांसाठी (वैद्यकीय,आयुर्वेद,उनानी व सिद्ध होमिओपथी, पारिचारक, दंत व औषध निर्माणशास्त्र) सदस्यत्व देऊन परिषदांचे बळकटीकरण करण्याचा मानस आहे.

क्लिनिकल आस्थापनांचे नियमन-काही राज्यांनी क्लिनिकल आस्थापना कायदा २०१० स्वीकारला आहे. अन्य राज्यांनीही तो स्वीकारावा यासाठी प्रयत्न. क्लिनिकल आस्थापनांचे गुणवत्तेनुसार वर्गीकरण (ग्रेडिंग), तेथे रूग्ण हक्कांचे संरक्षण (माहितीचा हक्क, ती मिळाल्यानंतर संमती, वैद्यकीय रेकॉर्डस व रिपोर्ट्स मिळणे, दुसरे मत घेण्याचा हक्क, गोपनीयता व वैयक्तिकता जपण्याचा हक्क) वैद्यकीय सेवांचा स्तर, किंमत, निष्काळजीपणा, अयोग्य, अनैतिक पद्धती, याविषयी तक्रारी सुनावणीसाठी स्वतंत्र न्यायासन (ट्रायब्युनल) नेमण्याची शिफारस. प्रयोगशाळा, इमेजिंग सेंटर्स, तसेच उभरत्या सेवांसाठी (एआरटी म्हणजे सहाय्यीकृत प्रजनन तंत्रज्ञान, सरोगसी म्हणजे भाडोत्री मातृत्व, मूळपेशी म्हणजे स्टेम सेल्स बँक, अवयव व ऊती प्रत्यारोपण, अतीसूक्ष्म (नॅनो) औषधे) प्रमाणित नियामक चौकट निर्माण करण्यात येईल.

अन्न सुरक्षा कायदा २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर व मनुष्यबळ.

औषधे नियमन- औषधांच्या किंमती व उपलब्धीचे नियमन डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल्स करते. आरोग्यधोरणातील काही शिफारशी आहेत, मोठ्या प्रमाणावरील औषधे खरेदीसाठी सशक्त व पारदर्शी खरेदी धोरण. जनौषधी दुकानांसारख्या कमी खर्चाच्या फार्मसी शृंखला, तेथे जेनेरिक औषधे मिळण्याची हमी, ब्रँडेड व नॉन ब्रँडेड जेनेरिक औषधांविषयी समाजात जनजागृती, औषधउद्योगासाठी कॉमन इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीस प्रोत्साहन, औषधे नियमन पद्धती सशक्त व व्यावहारिक करणे, या क्षेत्रात संशोधन व विकासास चालना व प्रोत्साहन.

वैद्यकीय उपकरणे नियमन- व्यवस्था सशक्त करणे, नवनिर्मिती व वैद्यकीय उपकरणांचे भारतात उत्पादन करणारे भारतीय उत्पादक तयार करण्याच्या दृष्टीने नियामक संस्था प्रस्थापित करणे. स्थानीय नियामक मानकांचा ताळमेळ आंतरराष्ट्रीय मानकांसोबत घालण्यास (हार्मनायझेशन) पाठिंबा, आपल्या देशातील नियामक व्यक्ती व संस्थांची आंतरराष्ट्रीय पद्धतींनुसार क्षमताबांधणी करण्यासाठी सर्वात जास्त प्राधान्य. बाजारात औषधे, रक्त उत्पादने, वैद्यकीय उत्पादने आल्यावर त्यांच्यावर नजर व देखरेख (पोस्ट मार्केट सर्व्हेलन्स) ठेवण्याचे काम अधिक सशक्त करणे.

प्रयोगशालेय चाचण्या (क्लिनिकल ट्रायल्स) नियमन-नवीन उत्पादनाचा शोध व विकास ह्यासाठी क्लिनिकल ट्रायल्स आवश्यक आहेत.

थोर कृत्ये थोरांच्याच हातून घडतात. - सर्वेटीस

- त्यात सहभागी व्यक्तींचे हक्क, सुरक्षितता व कल्याणाची हमी देणाऱ्या नियमनासाठी औषधे व सौंदर्यप्रसाधने कायद्यात विशिष्ट कलमांचा अंतर्भाव करण्यात येईल.
- पारदर्शी व वस्तुनिष्ठ पद्धती नमूद करण्यात येतील. नैतिक व पुनर्शीलन समितीच्या कार्यांना बळकटी देण्यात येईल.
- अव्यवहारी औषधांवर देखरेख व नियमन सुरूच राहील.
- क्लिनिकल ट्रायल्सचे प्रायोजक, संशोधक व सहभागी व्यक्तींच्या भूमिका व जबाबदाऱ्या आणि मानके देणाऱ्या ग्लोबल गुड क्लिनिकल प्रॅक्टिस गाइडलाईन्सचे कठोर पालन करण्यात येईल.
- आयुष औषधांच्या प्रमाणीकरणासाठी योग्य नियामक चौकट तयार करण्याची हमी.

किंमती– नवीन धोरण जून १८ अखेरीस अपेक्षित.

लस सुरक्षितता– राष्ट्रीय लस धोरण २०११ अनुसार. सार्वजनिक व एकात्मिक लस उत्पादन केंद्रे बांधण्याची शिफारस.

प्राथमिक उपचारांकरिता सार्वजनिक सुविधेमार्फत मोफत किंवा कमी किंमतीत औषधे उपलब्ध करून देण्याचा मानस.

सूक्ष्मजीव प्रतिरोध– या समस्येसाठी खालील बाबींना संबोधित केले आहे.

- प्रतिजैविकांच्या वापरासंबंधी मार्गदर्शक तत्त्वांचे प्रमाणिकरण जलदतेने करणे.
- प्रतिजैविकांच्या ओटीसी वापरावर मर्यादा.
- सजीव पशूंवर वृद्धीप्रेरक(ग्रोथ प्रमोटर्स) म्हणून प्रतिजैविकांच्या वापरावर बंदी अथवा बंधने.
- औषधे वापराबाबत दक्षता (फामको व्हिजिलन्स)

डिजिटल हेल्थ टेक्नॉलॉजी– आरोग्यसेवा देणयात तंत्रज्ञानाची एकात्मिक भूमिका ओळखून,(इहेल्थ, क्लाउड, इंटरनेट ऑफ थिंग्ज, वेअरेबल्स इ.) राष्ट्रीय डिजिटल आरोग्य प्राधिकरण स्थापन करण्यात येईल.

आरोग्य सर्वेक्षण– ही व्याप्ती शुश्रूषा खर्च,आर्थिक संरक्षण, पुरावाधारित धोरण नियोजन व सुधारणांपर्यंत वाढविण्यात येईल.

आरोग्य संशोधन– या क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यात येईल. पुढील आघाड्यांना बळकटी.

- आरोग्यपद्धती व सेवा संशोधन
- नवीन व कल्पक वैद्यकीय उत्पादन
- आरोग्याशी संबंधित सर्व क्षेत्रातील संशोधन– उदा. शरीरशास्त्र, जैवरसायन, औषधशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पॅथॉलॉजी, रेण्वीय व पेशीविज्ञान.
- आयुष औषधांवरील शोध, नावीन्य व अनुवादात्मक संशोधन.
- आरोग्य निश्चिती करणारे सामाजिक घटक, तसेच अपंगत्व व ट्रान्सजेंडर आरोग्यासारख्या दुर्लक्षित राहिलेल्या बाबींवरील संशोधन.
- औषध संशोधनासाठीच्या विविध नियामक संस्था, डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल्स (औषधी विभाग), जैवतंत्रज्ञान, औद्योगिक धोरण, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग ह्या सर्वांना एकत्र आणणाऱ्या सर्वसाधारण क्षेत्रीय नवीनता परिषदेची (कॉमन सेक्टर इनोव्हेशन काउन्सिल) निर्मिती आरोग्य मंत्रालयासाठी करण्याचा मानस.

**संदर्भ व अधिक माहिती** : नॅशनल हेल्थ पॉलिसी २०१७.

**– सौ. ज्योती कुलकर्णी**
श्रीरंग सोसायटी, ठाणे
भ्रमणध्वनी : ९९८७०४५७९२

# महात्म्यास जन्मदिनाच्या शुभेच्छा!

*महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी हिंदुस्थान टाइम्स या इंग्रजी वृत्तपत्रात दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी लिहिलेल्या लेखाचा प्रा. अपर्णा कुलकर्णी यांनी केलेला अनुवाद खास दिशाच्या वाचकांसाठी - संपादक*

२ ऑक्टोबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१९ च्या काळात देशभरात राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १५० व्या जन्मतिथीचा उत्सव साजरा करण्यात येईल. त्या अनुषंगाने गांधींचे अभ्यासक आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. रामचंद्र गुहा यांनी गांधींच्या जन्मदिनाच्या निमित्ताने 'हिंदुस्थान टाईम्स' या दैनिकात लिहिलेल्या लेखाचा हा भावानुवाद.

येत्या वर्षभरात महात्मा गांधींच्या जन्मदिनाच्या निमित्ताने गांधी अनेक चांगल्या-वाईट गोष्टींसाठी स्मरण केले जातील आणि अगदी स्वतःची पापे धुण्यास अधीर असणाऱ्या राजकारण्यांनाही स्वतःचे नाव गांधींशी जोडून गांधी नावाच्या गंगेत हात धुऊन घेता येतील! गांधींच्या १५० व्या जन्मदिनाच्या निमित्ताने गांधींच्या हयातीत त्यांचा जन्मदिन कशा पद्धतीने साजरा झाला हे समजून घेणे अत्यंत रंजक आहे. १९३९ च्या २ ऑक्टोबरला गांधी ७० वर्षांचे झाले. या निमित्ताने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी गांधींच्या जीवन व कार्यावर लिहिलेल्या लेखांचा खंड प्रसिद्ध केला. ज्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाईन, प्रसिद्ध कवी योन नोगुची, कादंबरीकार पर्ल बक आणि तत्त्वज्ञ गिल्बर्ट मुटे यांनी लिहिलेल्या लेखांचा समावेश होता. महात्मा गांधींच्या या जागतिक पातळीवरील चाहत्यांबरोरच सी.फ. अँड्यूज, रवींद्रनाथ टागोर, मिर्झा इस्माईल आणि हेन्सी पोलक या त्यांच्या जवळच्या मित्रांचे लेखदेखील त्यात होते.

या सर्व लेखांमध्ये साउथ आफ्रिकन राजकारणी जॅन स्मटस् यांचा लेख माझा अत्यंत आवडता असून या लेखकाने गांधी नावाच्या लढवय्याचे वर्णन केले आहे. स्वातंत्र्याच्या उदार कार्यासाठी जनतेची सहानुभूती मिळवणे व त्यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी स्वतः कष्ट सोसणे, त्रास सहन करणे हे गांधीचे विलक्षण राजकीय योगदान आहे असे स्मटस् यांचे मत होते. जिथे जुन्या-रुढ राजकीय पद्धती अयशस्वी ठरत होत्या त्या काळात पौर्वात्य व विशेषतः प्राचीन भारतीय पद्धतीवर आधारित नव्या राजकीय अस्त्रांचा (सत्याग्रह) यशस्वी वापर गांधींनी केला.

राधाकृष्ण यांच्या या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या. त्यानंतर ५ वर्षांनी म्हणजेच गांधींच्या ७५ व्या जन्मतिथीला गाधींच्या काही मित्रांनी म्हणे डी. जी. तेंडुलकर, एम. चलपती राजे, मृदूला साराभाई आणि विठ्ठलभाई जव्हेरी यांनी गांधींच्या जीवनकार्यावर आधारित एक खंड प्रसिद्ध केला. ज्याची प्रस्तावना जवाहरलाल नेहरू यांनी लिहिली. यामध्ये पर्ल बक आणि आइन्स्टाईन यांच्या संदेशांशिवाय गांधींबरोबर स्वातंत्र्य लढ्यात काम केलेल्या जे. बी. कृपलानी, कमलादेवी चट्टोपाध्याय, सुशीला नायर, युसुफ मेहेरअली, पत्रकार फ्रँक मोरेस, के. ए. अब्बास आणि नंदलाल बोस अशा अनेक क्षेत्रांतील लोकांनी योगदान दिले. या सर्व लेखांमध्ये, ब्रिटिश मानववंशशास्त्रज्ञ वेरियर अल्विन यांनी लिहिलेला लेख अत्यंत प्रभावी आहे. कारण, त्यांचा लेख महात्मा गांधींवर लिहिलेला नसून गांधींच्या कार्यात मोलाचे योगदान दिलेल्या महादेवभाई देसाई

यांच्यावर आहे. १९१७ ते १९४२ या काळात महादेवभाई गांधींचे सचिव होते; पण गांधींच्या राजकीयच नव्हे तर सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातही महादेवभाई त्यांचे जवळचे सहकारी होते. महादेवभाईंच्या कार्याकडे बघून गांधींची महानता कळते.

१९१९ चया २ ऑक्टोबरला गांधींच्या वाढदिवसाला बेळगाव येथे एका सभेत एक वक्ता म्हणाला, '१८५७ च्या उठावानंतरच्या काळात गांधी हे असे एकमेव नेते आहेत ज्यांनी दाखवून दिले की, सत्याग्रहाच्या यशस्वितेसाठी सरकारला धारेवर धरता येते. आणखी एका वक्त्याने म्हटले की, टिळक आदी नेत्यांनी जे बोलून दाखवले ते गांधींनी कृतीतून दाखवले. त्याच वर्षी गांधींना मिळालेली सर्वात सुंदर भेट म्हणजे, गुजराती कवी मनालाल कवी यांनी लिहिलेली सुमारे ४०० ओळींची दीर्घ कविता. त्या कवितेच्या काही ओळी अशा :

'सत्य हेच ध्येय  
अपरिग्रह हेच शस्त्र,  
त्यांचा ब्रह्मचर्याचा बाणा आणि संतांसारखे आचरण,  
क्षमेचा सागर म्हणावा अशी वृत्ती,  
त्यांची सहनशीलता,  
योग्याप्रमाणे तटस्थ, संयमी वृत्ती.  
हे महात्म्या,  
तूच आहेस या भारताचा खरा शिक्षक,  
महान आत्मा - महात्मा!

१९४६ च्या २ ऑक्टोबरला, गांधी ७७ वर्षांचे झाले तेव्हा जगभराच्या नेत्यांनी, व्हिएतनामचे हो-चि पिन्ह, म्यानमारच्या आंग शान स्यू की, ब्रिटनच्या मजूर पक्षाचे नेते स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या पत्रांचा समावेश होता. गांधींवर शुभेच्छांचा वर्षाव करणाऱ्या अशा पत्रांच्या एका फायलीत एक अनामिक परंतु अत्यंत भावस्पर्शी पत्र आढळले. ज्यात लिहिले होते, ''पेनसिव्ल्हानिया राज्यातील माझ्या लहान गावातून - फोर्टी फोर्ट - मला असं म्हणायचंय की, तुमच्यामुळे जगातल्या लोकांचं जगणं सुसह्य झालंय. एक हिंदू नेता म्हणून जगाला तुम्ही येशू ख्रिस्ताची आठवण करून देता. कदाचित आमचा येशू तुमच्या रुपाने जगतोय आणि बोलतोय. तुमचा समकालीन म्हणून या पिढीबरोबर जगता आले हे माझं भाग्य आहे.''

आता, २०१८ ते २०१९ च्या २ ऑक्टोबर या काळात गांधींचं जगणं आणि त्यांचं योगदान यावर असंख्य लोक बोलतील, त्यांची १५० वी जन्मतिथी साजरी केली जाईल. पण प्रश्न असा की, जॅन स्मटस् आणि अल्विन किंवा ननालाल कवी आणि पेनसिल्व्हानियाचा 'तो' अनामिक यांच्यासारख्या प्रांजळ आणि प्रामाणिक शुभेच्छा गांधींसाठी व्यक्त केल्या जातील का?

**- अपर्णा कुलकर्णी**  
सेंट झेवियर्स कॉलेज,  
मुंबई - ०१  
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

### आषाढी एकादशी

दूर पंढरपूरात वैष्णवांचा मेळा पांडुरंगाच्या भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. त्याच वेळेस विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभागही बाल वारकऱ्यांच्या विठ्ठल नामाने दुमदुमून गेले होते.

प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी आषाढी एकादशीनिमित्त इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांची दिंडी शुक्रवार दि. २० जुलै २०१८ रोजी काढण्यात आली. वारकरी संप्रदायाचा अमूल्य ठेवा जपण्यासाठी शाळेतील बाळगोपाळही वारकऱ्यांच्या वेषात सज्ज झाले होते. विठ्ठल रुक्मिणी ही त्यांच्या वेशात अवतरले होते. त्यांची पूजाअर्चा, आरती झाल्यानंतर संत, वारकरी मंडळींची दिंडी काढण्यात आली. मा. मुख्याध्यापिका सौ. कुडव बाईंचे उत्तम मार्गदर्शन या कार्यक्रमास लाभले. टाइम्स ऑफ इंडियातर्फे याचे चित्रीकरणही करण्यात आले.

### गुरुपौर्णिमा

प्राचीन काळापासून आपल्याकडे गुरू-शिष्य परंपरा चालत आली आहे. गुरुंची महानता जाणून कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. या निमित्ताने २७ जुलै २०१८ रोजी इ. १ली ते ४थीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. शिक्षकांनी गुरुंची महती सांगितली. तसेच मुलांनीही गोष्टी, भाषणे, गाणी इ. मधून गुरुंबद्दल आदर व्यक्त केला. मा. मुख्याध्यापिका सौ. कुडव यांनीही आपल्या मार्गदर्शनात गुरुंची महती सांगितली.

### दिव्यांची अवस

अंधाराकडून प्रकाशाकडे नेणाऱ्या दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दि. ११ ऑगस्ट २०१८ रोजी दीपपूजा साजरी केली. आपल्या जीवनातील अंधार हा ज्ञानाच्या ज्योतीने उजळून टाकला पाहिजे हा संदेश आजच्या दीपपुजेतून विद्यार्थ्यांना दिला.

टेबलावर विविध प्रकारच्या दिव्यांची मांडणी केली होती. दीपपुजेचे महत्त्व, प्रार्थना, गाणी घेऊन कार्यक्रम साजरा केला गेला.

### श्रावणी शुक्रवार व रक्षाबंधन

श्रावण महिना म्हणजे सणांचा महिना. सामाजिक व मानसिक दृष्ट्या हा महिना खूप आनंदाचा व उत्साहाचा असतो. प्रत्येक दिवसाला या महिन्यात महत्त्व प्राप्त झालेले आहे. या दृष्टीने दि. २४ ऑगस्ट २०१८ रोजी श्रावणी शुक्रवार साजरा केला. गोष्ट, महत्त्व सांगून विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या शिकवणीचे बीज रुजवले गेले.

याच दिवशी भाऊ-बहीण या पवित्र नाते संबंधांचा सण साजरा केला. मुलांनी स्वतः राखी बनवून एकमेकांना बांधली. परस्पराचे रक्षण, एकता इ. गुण जोपासून मुलांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण केला. शिक्षकांनी रक्षाबंधनाचे महत्त्व, गोष्ट सांगितली.

### शैक्षणिक चित्रपट

शुक्रवार दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी विद्यार्थ्यांना 'रावस' हा शैक्षणिक चित्रपट दाखविण्यात आला.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- **आदर्श शिक्षक पुरस्कार**

ब्राह्मण सेवा संघ, ठाणे यांचे तर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार यंदा सौ. संध्या झंझाड यांना देण्यात आला.

'लोकमत'तर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार श्री. वासुदेव वैद्य यांना प्राप्त झाला.

---

जो स्वतःच्या अंतःकरणात लपून बसतो तो सर्वात बलाढ्य शत्रू. - पी. सायरस

भारत विकास परिषदेतर्फे दिला जाणारा 'गुणवंत शिक्षक' पुरस्कार सौ. प्रियांका सावंत यांना प्राप्त झाला.

वसंत स्मृती 'आदर्श शिक्षक' पुरस्कार २०१७-१८ साठी ठाणे जिल्ह्यातून शाळेतील उत्साही शिक्षिका सौ. साधना कारंडे-जोशी यांची निवड करण्यात आली.

● भारत विकास परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या प्रश्न-मंजुषा स्पर्धेत इ. ९ वी अ मधील विद्यार्थिनी जान्हवी महाडीक व आकांक्षा कोंढारे यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

इ.६ वी अ मधील सोहम सकपाळ व श्रेया पाटील यांची अंतिम फेरीसाठी निवड झाली.

● भारत विकास परिषद वसंत विहार शाखेतर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय समुह गीत गायन स्पर्धेत इ.५वी व इ.९वी तील विद्यार्थिनींनी भाग घेऊन परीक्षकांची वाहवा मिळवली.

● श्री समर्थ व्यायाम शाळा, स्त्री कल्याण संघटनेतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत इ.७ वी, ८ वीच्या गटातून कु. योगराज तरे - ७ वी अ यास द्वितीय क्रमांक पारितोषिक तर इ. ९ वी, १० वीच्या गटातून कु. ऋचा जोशी (१० अ) हीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. तसेच ढाल स्पर्धेत इ. ९वी, १० वीच्या गटातून कु. सेजल रांगळे (१०अ) हीस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

● पर्यावरण दक्षता मंचतर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी 'झाडे ओळखा' या स्पर्धेत साई ननावरे (७ अ) यास प्रथम क्रमांकाचे तर हर्षद यमगर यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

● पर्यावरण दक्षता मंच ठाणे आणि श्रीरंग एज्युकेशन सोसायटी आयोजित 'निसर्गमेळा २०१८', 'ऑलिव्ह रिडले कासव महोत्सव' दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत पार पडला.

यानिमित्ताने आयोजित साहसी खेळ (रिव्हर क्रॉसिंग रॅपलिंग) जादूचे प्रयोग, पॉटमेकिंग यात आपल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### के. जी. विभाग

सणांची रेलचेल असणारा श्रावण महिना संपल्यावर येतो. गणपती बाप्पांच्या आगमनाचा भाद्रपद महिना. सर्वांच्या लाडक्या बाप्पाचे आगमन १२ सप्टेंबर रोजी पूर्व प्राथमिक विभागात झाले.

गणपतीची विविध रूपे, आगमनापासून ते विसर्जनापर्यंतचे सर्व उपचार, त्याचे महत्त्व असलेली चित्रे, तक्ते व्हरांड्यात तसेच वर्गात लावली गेली. गणपतीची गाणी, श्लोक मुलांना शिकवले होते. बालरूप गणेशाच्या गोष्टींची सीडी मुलांना दाखवली गेली. गणेशाच्या आगमनापूर्वी हा उत्सव पर्यावरण पूरक साजरा का व कसा करायचा याची माहिती मुलांना दिली गेली.

१२ सप्टेंबर रोजी मुलांना पारंपरिक वेशभूषा केली होती. शिक्षकांसोबत जाऊन शाडू मातीची मूर्ती आणली. गणपतीचा गजर करत टाळ, लेझीमच्या साथीने बाप्पा विराजमान झाले. शिक्षकांनी 'श्रीं' ची पूजा व आरती केली. गाणी, श्लोक म्हणून मुलांनी बाप्पांचे स्वागत केले. पौष्टिक ड्रायफ्रूटचा खाऊ प्रसाद म्हणून मुलांना दिला.

प्राथमिक विभागाच्या काही मुलांनी अथर्वशीर्ष पठण केले, तर सिनीयर के.जी.च्या मुलांनी गणपती स्तोत्र म्हटले. नंतर पुन्हा आरती करण्यात आली. मूर्तीचे विसर्जन तलाव, नदीत न करता घरीच बादलीत का करावे याचे कारण सांगितले गेले.

वर्गातच बादलीत पाण्यात विसर्जन केले. या प्रकारे केलेल्या विसर्जनामुळे जलचर जीवांचे रक्षण होण्यास मदत होते. थर्माकोल, प्लास्टिकचा वापर टाळल्याने पर्यावरणाचे संरक्षण होते.

नर्सरी विभागातील मुलांना मोदकाचे चित्र दिले, जे पालकांच्या मदतीने त्यांनी सजवले. ज्यूनियरच्या मुलांनी गणपतीचे चित्र वर्तमानपत्रातून कापले ते चिकटवले आणि जास्वंदीचे फुल व मोदक रंगवले. सिनियरच्या मुलांनी चिकणमातीपासून गणपती बनवला.

मुलांच्या आवडत्या बाप्पांच्या उत्सव त्यांनी आनंदात, उत्साहात साजरा केला.

२८ सप्टेंबरला नर्सरी विभागात 'फळांचा दिवस' साजरा केला गेला. प्रत्येक मुलाने एका फळाची प्रतिकृती (cut out) आणली होती. ती धरून फळाबद्दल माहिती सांगितली. या उपक्रमांमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होतेच. तसेच समाधीटपणा वाढतो. मुलांनी डब्यातसुद्धा फळे आणली होती.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### कॉमर्स व मॅनेजमेंट असोसिएशनचे उद्‌घाटन

महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे कॉमर्स व मॅनेजमेंट असोसिएशनचे उद्‌घाटन ४ सप्टेंबर रोजी करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, व्ही एन ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी, ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती व डॉ. रश्मी अग्निहोत्री व्यासपीठावर होत्या. या वेळी प्रा. मूर्ती यांचे How to Attain and Maintain a Winning Edge या विषयावर व्याख्यान झाले.

### सौरभ चव्हाणचा उत्कृष्ट वक्ता म्हणून गौरव

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ व्या राष्ट्रीय युवा संसदेत जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या बी. एम्. एस्. तृतीय वर्षातील विद्यार्थी सौरभ चव्हाण यास मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय संघातील उत्कृष्ट वक्ता म्हणून गौरविण्यात आले. तर मुंबई विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर चौथ्या क्रमांकाचा मान पटकाविला. याचा बक्षीस समारंभ दि. २० सप्टेंबर २०१८ रोजी नवी दिल्लीत संसदीय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या हस्ते संपन्न झाला. विकसनशील भारताच्या उत्कर्षाला तरुणांनी हातभार लावावा, तरुणांच्या विचारांना व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांना संसदीय कामकाज प्रत्यक्ष अनुभवता यावे यासाठी राष्ट्रीय युवा संसदेचे आयोजन करण्यात येते.

त्यासाठी महाविद्यालय, विद्यापीठ व त्यानंतर विद्यापीठाच्या राष्ट्रीय संघात निवड अशा अनेक चाचण्यांतून विद्यार्थ्यांची निवड होते. या यशात सौरभची मेहनत आणि जिद्द महत्त्वाची आहेच, पण त्यासाठी त्याचे प्रेरणास्थान होते महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक! तसेच स्टुडंट फोरमच्या प्राध्यापिका प्रज्ञा राजेबहादूर व प्राध्यापिका डॉ. विमुक्ता राजे यांचे व मुंबई विद्यापीठाच्या युवा संसदेचे समन्वयक, प्राध्यापक डॉ. हर्षद भोसले व त्यांचे प्राध्यापक सहकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### माजी ग्रंथपाल डॉ. प्रतिभा गोखले यांचे Effective Reading विषयी व्याख्यान



विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे माजी ग्रंथपाल डॉ. प्रतिभा गोखले यांचे Effective Reading या विषयाचे व्याख्यान दिनांक १ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी ०९:०० ते १०:०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या A. V. रूममध्ये पार पडले.

सदर कार्यक्रमास शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. प्रतिभा गोखले या मुंबई विद्यापीठाच्या माजी ग्रंथपाल होत.

●●●

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

१६१३ साली गॅलिलिओ यांनी त्यांच्या वैज्ञानिक निरीक्षणाची माहिती देणारे एक पत्र बेनेदेत्तो कॅसेली यांना लिहिले. या पत्रात त्यांनी स्पष्टपणे लिहिले की, बायबलमधील ग्रहताऱ्यांची वर्णने ही शब्दशः घेता येणार नाहीत. एवढेच नाही तर यासंदर्भात विधाने करण्याचा धर्मगुरुंना अधिकार नाही. आपल्या ह्या पत्रात त्यांनी पुन्हा कोपर्निकसची पाठराखण तर केलीच, आणि असेही नोंदवले की, ही निरीक्षणे बायबलच्या वचनांशी असंबद्ध नाहीत. या दोन गणितज्ञांमधील हा पत्रव्यवहार साहजिकच चर्चेचा विषय झाला.

शेवटी व्हायचे तेच झालं.

निकोलो लोरिनी (Niccolo Lorini) या धर्मप्रसारकाने गॅलिलिओच्या या पत्राची प्रत ७ फेब्रु. १६१५ ला रोममधील ख्रिस्ती धर्मन्यायपीठाकडे (Inquision) पाठवली. कोपर्निकसच्या बाजूनी भूमिका घेणाऱ्यांना शिक्षा ही जिवंत जाळण्याची होती, हे ब्रुनोच्या बाबतीत आपण बघितलंच आहे. गॅलिलिओलाही आपले पत्र रोमला पोचल्याचे समजले होते. १६ फेब्रुवारी १६१५ ला रोममधील एक धर्मप्रसारक पिरो दिनी (Piero Dini) यांना गॅलिलिओने एक पत्र पाठवले. त्या पत्रात त्यानी अशी भीती व्यक्त केली की, निकोलो लोरिनींनी जे पत्र धर्मन्यायपीठाकडे सुपुर्द केले आहे त्यामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. म्हणून गॅलिलिओने कॅसेली यांना लिहिलेल्या मूळ पत्राची एक नक्कल त्यांना पाठवली. अर्थातच हे पत्र गॅलिलिओने बदलून सौम्य केले होते. चर्चच्या रोषाला बळी न पडण्याची गॅलिलिओ यांची ती केविलवाणी धडपड होती.

विज्ञान आणि धर्मसत्ता यांच्या संघर्षामध्ये गॅलिलिओने कणखर भूमिका घेऊन विज्ञानाचीच पाठराखण केली अशी त्यांची प्रतिमा होती, आणि आहे. गेली ४०० वर्ष इतिहासाच्या संशोधकांना या दोन्ही पत्रांच्या नकला उपलब्ध होत्या, मूळ पत्र उपलब्ध नव्हते. अर्थातच गॅलिलिओ असा काही बदल करेल असे अभ्यासकांना पटत नव्हते. रॉयल सोसायटीमध्ये मिळालेले पत्र हे म्हणूनच महत्त्वाचे आहे. त्याचे महत्त्व असे आहे की, आपल्या हस्ताक्षरानीच, बेनेदेत्ते कॅसेली यांना पाठवलेल्या मूळ पत्रामध्ये काही ठिकाणी बदल करून ते सौम्य करण्याचा प्रयत्न गॅलिलिओने केलेला दिसतोय. आपल्या मूळ पत्रात बायबलमधील वचनांच्या बाबतीत गॅलिलिओ लिहितात, 'false if one goes by the literal meaning of the words'. यातला 'false' हा शब्द खोडून त्यानी 'look different from the truth'



**गॅलिलिओच्या हस्ताक्षरातील मूळ पत्र**



**गॅलिलिओच्या पत्रात गॅलिलियोनेच केलेली खाडाखोड**

मत्सराला मरण माहीत नसते. - जॉन बुर्कीअर

हे वाक्य लिहिले. तसेच आणखी एका ठिकाणी 'concealing' हा थोडा भडक अर्थाचा शब्द बदलून 'veiling' असे सौम्य रूप त्याला दिले. सात पानांच्या या पत्रामध्ये इतरही छोटे-मोठे बदल त्यांनी केले आहेत. या पत्राच्या शेवटी G.G. अशी गॅलिलिओ यांची सहीपण आहे.

संशोधक कुठल्याही निष्कर्षाला येण्याआधी बऱ्याच तपासण्या आणि चौकशा करतात. त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींचीही मते घेतली जातात. या मिळालेल्या नवीन पत्राचीही संशोधकांनी कसून तपासणी केली. हस्ताक्षर तज्ज्ञांनी तत्कालीन उपलब्ध असलेल्या गॅलिलिओच्या कागदपत्रांची पडताळणी करून हे पत्र गॅलिलिओच्याच हस्ताक्षरांत असल्याचे व त्यातील बदलही गॅलिलिओनेच केल्याचे सिद्ध केले आहे.

साहजिकच गॅलिलिओंना १६१६ मध्येच कोपर्निकसच्या सिद्धांताची पाठराखण न करण्याचे निर्देश देण्यात आले होते. कोपर्निकसच्या सिद्धान्ताना पुष्टी देणाऱ्या सगळ्या पुस्तकांवरही त्यावेळी बंदी घालण्यात आली.

गॅलिलिओंचे संशोधन पुढे चालूच होते. १६३२ साली चर्चला मान्य असलेल्या टोलेमी म्हणजे 'भूकेंद्रित' सिद्धान्त, आणि कोपर्निकसच्या 'सूर्यकेंद्रित' सिद्धांत यांची दोन्ही बाजूंनी तुलना करणारे "Dialogue Concerning the Two Chief World Systems" हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले. साहजिकच त्यामुळे गॅलिलिओंना पुन्हा रोमच्या धर्मन्यायपीठापुढे हजर व्हावे लागले. गॅलिलिओने आपली बाजू मांडताना, 'मी हे फक्त 'गृहितक' (hypothesis) म्हणून मांडले आहे, असा युक्तिवाद केला. अर्थातच तो अमान्य झाला, आणि पुन्हा त्यांना शिक्षा होऊन तुरुंगात पाठवण्यात आले. नंतर या शिक्षेचे परिवर्तन साध्या नजरकैदेत करण्यात आले. तिथेही त्यांनी "Two New Sciences" हे पुस्तक लिहिले. शेवटी शेवटी त्यांना अंधत्वही आले होते. वयाच्या ७८ व्या वर्षी गॅलिलिओंचे निधन झाले.

युरोपमध्ये धर्मसत्तेचा अतिरेक झाल्यावर प्रबोधन युगाचा जन्म झाला. कोपर्निकस, गॅलिलिओ किंवा न्यूटन हे कोणीही धर्मविरोधी नव्हते. प्रश्न होता तो बायबलच्या परिघाबाहेर विचार करण्याचा, धर्मगुरुंच्या हस्तक्षेपाचा, आणि नवविचार मांडणाऱ्यांना धर्मबाह्य ठरवून अगदी जिवंत जाळण्यापर्यंत शिक्षा देण्याचा.

१९७९ साली आईंस्टाईन यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमामध्ये तत्कालीन पोप, जॉन पॉल २ यांनी ख्रिस्ती धर्मगुरुंनी, 'गॅलिलिओला १७ व्या शतकात दिलेली शिक्षा गैर होती' हे मान्य केले. अर्थातच ही चूक समजायला ३५० वर्षे जायला लागली.

भारतामध्ये ५ व्या शतकातील आर्यभट्टापासून २० व्या शतकातील ग्रहगणिताच्या अभ्यासकांपर्यंत शंकराचार्यांनी कोणालाच शिक्षा दिल्याचे ऐकिवात नाही. पाश्चात्य विश्वातील 'धर्म' संकल्पना आणि भारतातील 'धर्म' संकल्पना संपूर्णतः भिन्न आहेत. दैवत, उपासना आणि त्याचे सगळे उपचार हे या संकल्पनेचा भाग आहेतच पण आपली धर्म संकल्पना अधिक व्यापक आणि लवचिक आहे.

कोपर्निकस, गॅलिलिओ किंवा न्यूटन यांनी विज्ञानावर प्रचंड लिखाण केले आहे. यांच्या वेगवेगळ्या विद्यापीठांच्या किंवा खाजगी ग्रंथालयांमध्ये असलेल्या कागदपत्रांचे संकलन करून त्यांच्या अंकीकरणाचे (digitization) कामही बहुतांशी पुरे होत आले आहे. यामुळे फार मोठी बौद्धिक संपदा संशोधकांना आज उपलब्ध झाली आहे. हे लिखाण साधे नसून आधुनिक विज्ञानाचा तो पायाच आहे.

या सगळ्यांवरती आणि त्यांच्या संशोधनावरती हजारोंनी पुस्तकं आज उपलब्ध आहेत, पण तरीही अजून संशोधन चालूच आहे. संशोधक मूळ कागदपत्रांकडे जाऊन

मत्सराने कोणीही श्रीमंत होत नसतो. - ड्रेक्स

त्यांची पडताळणी करत असतात. आणि यामध्ये काही नवीन आढळले तर ते शोधनिबंधांच्या माध्यमातून प्रकाशितही करतात. त्याकरता गरज असते ती मूळ कागदपत्रांची. एखादा मिळालेला नवीन कागद, प्रस्थापित ऐतिहासिक सिद्धान्ताना कलाटणी देऊ शकतो. गॅलिलिओचे मिळालेले अस्सल पत्र हे त्याचे चांगले उदाहरण आहे.

या पार्श्वभूमीवर रामानुजन सोडले तर इतर भारतीय संशोधकांची हस्तलिखिते संशोधकांना मिळणे जवळजवळ दुरापास्त आहे. रामानुजन यांच्यावरतीही बहुतेक काम हे अमेरिकेतच चालू आहे.

दुर्बिणीच्या शोधाआधी आणि नंतरही भारतातल्या ग्रहगणित्यांनी प्रचंड काम करून ठेवले आहे. त्यांच्या कामाची पुरेशी नोंद जगातच काय पण भारतातही पुरेशी घेतली गेलेली दिसत नाही. १९ व्या शतकातील बापूदेव शास्त्री (१८२१ ते १९००), आणि चंद्रशेखर सामंता (१८३५ ते १९०४) यांनी ग्रहगणितात काही मूलभूत संशोधन करूनही आज ते अपरिचितच आहेत.

चंद्रशेखर सामंता यांनी दुर्बिणीचा वापर न करता, वेध घेण्याची परंपरागत उपकरणे तयार केली होती. त्यावर आधारित निरीक्षणांवर 'सिद्धान्त दर्पण' हा ग्रंथ त्यांनी १८९८ साली प्रकाशित केला. याचे परिक्षण १८९९ सालच्या नेचर (Nature 59, 430) या जगप्रसिद्ध विज्ञान पत्रिकेत प्रकाशितही झाले होते. बापूदेव शास्त्री यांनी सूर्यसिद्धान्त, आणि भास्कराचार्यांच्या सिद्धान्त शिरोमणीचे इंग्रजीमध्ये भाषांतर करून ते जगाला प्रथमच उपलब्ध करून दिले. १८५८ सालच्या Journal of the Asiatic Society of Bengal मध्ये Bhaskara's Knowledge of the Differential Calculus हा संशोधन निबंध त्यांनी प्रकाशित केला होता. कॅलक्युलसच्या शोधाचे श्रेय न्यूटन (१६४३ ते १७२७) यांना दिले जाते. बापूदेव शास्त्रींच्या माहितीप्रमाणे हे श्रेय १२ व्या शतकातील गणिती भास्कराचार्य (१११४ ते ११८५) यांना मिळायला हवे.

आर्यभट्ट, भास्कराचार्य ते केरळमधील १६ व्या १७ व्या शतकातील गणिती व इतर वैज्ञानिक विषयांवरील लाखोंनी पोथ्या भारतातील ग्रंथालयामध्ये आज पडून आहेत. Digital Library of India च्या माध्यमातून अशा पोथ्यांच्या अंकीकरणाचे काम थोडेफार चालू आहे. पण त्याची माहिती आणि उपयोग भारतामधील संशोधनामध्ये होताना फारच कमी दिसतो.

गणपती ही बुद्धीची देवता तर दुर्गा ही कुप्रथा आणि तशाच असुरी शक्तींचा नाश करणारी देवता. त्यांच्या नावांनी होणारे आजच्या उत्सवांचे स्वरूप, त्यावर होणारा खर्च हे सगळे नक्कीच 'ज्ञानाधिष्ठीत' समाजाचे लक्षण नाही. दिवसेंदिवस त्यामधला बकालपणा वाढतच आहे. या मानसिकतेमध्ये आमूलाग्र बदल झाल्याशिवाय संशोधनाला पोषक वातावरण आणि साधनांची निर्मिती होणार नाही.

मायकेल ऐंजेलो यांचा मृत्यू १५६४ साली झाला. १५६४ लाच गॅलिलिओंचा जन्म झाला. १६४२ ला गॅलिलिओंचा मृत्यू झाला आणि त्याच वर्षी न्यूटन यांचा जन्म झाला. युरोपमधील प्रबोधन युगाप्रमाणेच आधुनिक विज्ञानामधलेही हे महत्त्वाचे टप्पे आहेत. भविष्यातील आर्यभट, भास्कराचार्य आणि रामानुजनही भारतामधील अशाच प्रबोधनाची वाट पहात आहेत. उत्सव नाहीत; तर बुद्धीची म्हणजे गणपतीची खरी उपासनाच असे प्रबोधन घडवू शकेल.

**– डॉ. विजय बेडेकर**

●●●

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**संपर्क**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.